



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २५३ * नांदेड * मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया सुरु

## पावसाची तूट असलेल्या ठिकाणी पहिला ट्रिगर लागू


**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यात यंदा अपेक्षेइतका पाऊस न झाल्याने अनेक भागांमध्ये खरीप हंगामावर परिणाम झाला आहे. पावसातील तूट आणि पिकांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ज्या भागांमध्ये पावसाची लक्षणीय कमतरता आहे, तेथे सध्या पहिली कळ (ट्रिगर-१) लागू करण्यात आली आहे.

दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्याच्या पुढील टप्प्यात ट्रिगर-२ महत्त्वाचा ठरणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींचे विश्लेषण सध्या वेगाने केले जात आहे. यामध्ये पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, जलाशयांमधील पाणीसाठा तसेच उपग्रहाच्या माध्यमातून मिळणाऱ्या एनटीव्हीआय डेटाचा अभ्यास केला जात आहे. महाराष्ट्रातील दुष्काळ मूल्यांकन प्रक्रियेत पर्जन्यमान, पीकस्थिती, मातीतील ओलावा आणि रिमोट सेन्सिंगसह विविध निर्देशकांचा वापर केला जातो.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ अंतर्गत खरीप हंगामातील दुष्काळ जाहीर करण्यासाठी निश्चित कालमर्यादा आहे. राज्य शासनाला खरीप हंगामासाठी ३० ऑक्टोबरपर्यंत, तर रबी हंगामासाठी २१ मार्चपर्यंत दुष्काळ जाहीर करता येतो. त्यामुळे उपलब्ध तांत्रिक अहवाल आणि क्षेत्रीय स्थितीच्या आधारे या कालावधीत निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

राज्याचे कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी कार्यरत आहे. महसूल, कृषी, जलसंपदा, हवामान विभाग यांसह विविध संबंधित विभागांचे प्रमुख या समितीमध्ये सदस्य आहेत.

क्षेत्रीय स्तरावरून प्राप्त होणारी माहिती, ट्रिगर-१ आणि त्यानंतरच्या प्रभाव निर्देशकांचे विश्लेषण यांचा सविस्तर अहवाल या समितीकडून तयार केला जाणार आहे. हा अहवाल राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर शासन



स्तरावर दुष्काळ घोषित करण्याबाबत अंतिम कार्यवाही केली जाईल. त्यानंतर शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर एनडीआरएफ/सीडीआरएफ निकषांनुसार देय मदत बाधित शेतकऱ्यांच्या आधार-संलग्न खात्यांमध्ये डीबीटीच्या माध्यमातून जमा केली जाणार आहे. तोपर्यंत शेतकऱ्यांनी आवश्यक पंचनामे आणि ई-पीक पाहणी पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे. आगामी मंत्रिमंडळ बैठकीतही दुष्काळ जाहीर करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबी आणि त्यांचे विश्लेषण यावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील दुष्काळी परिस्थितीचा प्रत्येक आठवड्याला आढावा घेतला जात आहे. राज्यातील एकूण परिस्थितीचा विचार करता मराठवाड्यातील अहवाल प्राधान्याने मागवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, दुष्काळाचे मूल्यांकन ही पावसाच्या तुटीपुरती मर्यादित प्रक्रिया नसून पीक क्षेत्र, जमिनीतील ओलावा, वनस्पती निर्देशांक, जलस्रोत आणि इतर परिणाम निर्देशकांचाही विचार केला जातो. त्यामुळे ट्रिगर-२ च्या विश्लेषणानंतरच दुष्काळाची तीव्रता आणि पुढील प्रशासकीय निर्णय स्पष्ट होणार आहेत.

# मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात; देशात १५ टक्के पावसाची तूट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– एकीकडे देशात यंदा सरासरीच्या तुलनेत तब्बल १५ टक्के पावसाची तूट नोंदवली गेली असतानाच, आता हवामान विभागाने मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. २१ सप्टेंबरपासून नैऋत्य मोसमी वारे राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या काही भागांतून माघारी फिरले आहेत. एका बाजूला मान्सून काढता पाय घेत असताना, दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र पुढील तीन दिवस विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान शास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि राजस्थानच्या बहुतांश भागांतून मान्सून माघारी फिरण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या २ ते ३ दिवसांत सौराष्ट्र-कच्छ, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम उत्तर प्रदेशातूनही मान्सून काढता पाय घेईल. मात्र, यंदा मोसमी पावसाने अनेक भागांत दांडी मारल्याने देशात १५ टक्के तुटीसह 'दुष्काळात तेरावा महिना' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

# भारताने सज्ज राहावे; 'सुपर' एल निनोचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– आगामी काळात भारतावर 'सुपर' एल निनोचे संकट घोंघावण्याची शक्यता असून, त्याच्या संभाव्य परिणामांना सामोरे जाण्यासाठी शास्त्रज्ञ आणि धोरणकर्त्यांनी तातडीने तयारी करावी, असे आवाहन देशातील १८८ शास्त्रज्ञ आणि पर्यावरण अभ्यासकांनी केले आहे. एल निनोमुळे पावसावर परिणाम होण्याबरोबरच उष्णता, दुष्काळ, जंगलातील आगी आणि प्रवाळभित्तींच्या ऱ्हासासारख्या पर्यावरणीय संकटांची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

आगामी एल निनोच्या परिणामांचे शास्त्रीय पद्धतीने दस्तऐवजीकरण करण्याची गरज नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आवाहनात अधोरेखित करण्यात आली आहे. एल निनोची निर्मिती ज्या प्रशांत महासागरात होते, तेथील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान ०.५ अंश सेल्सिअसच्या निर्धारित मर्यादेपेक्षा वाढले असून, ऑगस्ट २०२६ मध्ये ते २.६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. आगामी काळात ही तापमानवाढ चार अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

यामुळे जंगलांमध्ये आगी वाढण्याबरोबरच मोठ्या आकाराच्या वर्षावन वृक्षांवरही दुष्काळ आणि उष्णतेचा विपरीत परिणाम होऊ शकतो. पश्चिम घाटातील अनेक मोठी झाडे आधीच त्यांच्या उष्णता सहन करण्याच्या मर्यादेच्या जवळ असल्याचे शास्त्रज्ञांनी नमूद केले आहे. शहरांमध्ये 'हिट आयलंड' परिणामामुळे झाडे आणि वनस्पतींवर उष्णतेचा ताण आणखी वाढण्याची शक्यता आहे.

एल निनोच्या पूर्वसूचना मिळत असताना त्याचे परिणाम नोंदवण्यासाठी आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिकांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अलीकडील एल निनो घटनांची वाढती तीव्रता ही जागतिक हवामान बदलाच्या वेगाचे संकेत असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

# किनवट आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात तब्बल १६ कोटींचा महाघोटाळा! वरिष्ठ लिपिकावर गुन्हा दाखल

**किनवट (प्रतिनिधी)**– किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात शासकीय निधीचा प्रचंड अपहार आणि आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला आहे. दि.१ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या २९ महिन्यांच्या कालावधीत तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांच्या सार्वजनिक निधीचे अनाधिकृत वळतीकरण करून रोखपाल तथा वरिष्ठ लिपीक भगवान डवरे याने अपहार केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध वेगवेगळ्या १५ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.



किनवटचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय हे अनुसूचित जमातीतील घटकांसाठी कल्याणकारी योजना आणि विकासकामे राबवते.यासाठी किनवटच्या भारतीय स्टेट बँक शिवाजी चौक शाखेतील खात्याचा (खाते क्र. ६२०१२४७८६३) वापर केला जातो.दि.१६ सप्टेंबर २०२६ रोजी या प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी बी.सरवणन यांनी नियमित प्रशासकीय आढावा घेत असताना त्यांना बँक खात्यात मोठी संशयास्पद तफावत आढळली. त्यावरून त्यांनी तातडीने अंतर्गत छाननी समिती गठीत करून रोखपाल भगवान डवरे यांच्या कक्षाचा ताबा घेण्याचे सांगत दस्तऐवजांची तपासणी करण्याचे आदेश समितीला दिले.छाननी समितीच्या तपासणीत गेल्या २९ महिन्यांत बँकेतून तब्बल २८० शासकीय धनादेश वटवून पैसे वर्ग करण्यात आले. परंतु, या एकाही व्यवहाराची नोंद कार्यालयाच्या अधिकृत धनादेश नोंदवहीत किंवा रोखवहीत करण्यात आलेली नव्हती. नोंद नसलेल्या २८० धनादेशांमधील कोट्यवधी रुपयांची रक्कम थेट खासगी अनोळखी व्यक्ती,व्यावसायिक दुकाने आणि इतर अशासकीय घटकांच्या बँक खात्यांवर वर्ग करण्यात आली. एकूण ५७ प्राप्तकर्त्यांच्या खात्यांवर २३४ व्यवहारांद्वारे १३.६७ कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा केली गेली. खात्यांवर ४६ व्यवहारांद्वारे उर्वरित रक्कम वर्ग करण्यात आली.

### भांडाफोड टाळण्यासाठी रोख रक्कम जमा

दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी तपासणी सुरू झाल्यावर दैनिक शिल्लक रकमेतील तफावत दडपण्यासह भांडाफोड टाळण्यासाठी रोखपाल डवरे याने कोणत्याही पावतीशिवाय ३ लाख रुपयांची रोख रक्कम परस्पर शासकीय खात्यात जमा करून बनावटगिरी करण्याचा प्रयत्न केला.

### कोट्यवधींचा निधी; खात्यात मात्र ६ लाखच

आदिवासी कल्याण योजनांचा कोट्यवधींचा निधी हाताळणाऱ्या या शासकीय खात्यात दि.१६ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ ५ लाख ९९ हजार ९९६ रुपये इतकीच शिल्लक उरली होती.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या किनवटच्या इतिहासातील हा सर्वात मोठा घोटाळा आहे.याप्रकरणी प्रकल्प कार्यालयाचे सहायक प्रकल्प अधिकारी प्रेमसिंग आडे यांच्या तक्रारीवरून किनवट पोलिसांनी या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार भगवान डवरे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१४, ३१६ (२), ३१६ (४), ३१६ (५), ३१८ (२), ३१८ (३), ३१८ (४), ३२०, ३२३, ३३६ (२), ३३६(३), ३३८, ३३९, ३४० व ६१ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्रकरणाची चौकशी नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे

वरील महाघोटाळ्याची प्राथमिक चौकशी आधी किनवटचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्याकडे होती.घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता पाहाता याप्रकरणाची अधिक चौकशी नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार सोमवारी सायंकाळी उशिरापर्यंत पोलिसांच्या हाती लागला नव्हता.

# क्षमतेपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या डीजेंवर बंदीचे आदेश, आज तातडीची सुनावणी

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सण आणि उत्सवांच्या काळात होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा चर्चेत आहे. पुण्यातील विद्यानंद बापट यांनी ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा मांडला होता. त्यांच्या मुद्याला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला होता. आता मुंबई हायकोर्टाकडून सण-उत्सवातील ध्वनीप्रदूषणाच्या मुद्याची सुमोटो दखल घेण्यात आली आहे. न्यायमूर्ती जीएस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठानं डीजेमुळं होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाची दखल घेतली आहे.

मुंबई हायकोर्टाकडून ध्वनी प्रदूषणाचे नियम आणि अंमलबजावणीचा अहवाल आज सादर करण्याचे सरकारला आदेश देण्यात आले आहेत. हायकोर्टानं आमचा कोणत्याही धर्माच्या सणाला विरोध नाही; मात्र इतरांना त्रास होऊ नये, असं निरीक्षण नोंदवलं आहे. नियम मोडणाऱ्यांची साऊंड सिस्टीम जप्त करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश देखील पोलिसांना देण्यात आले आहेत. हायकोर्टानं हे आदेश वर्षभरातील सर्व धर्मांच्या मिरवणुकांना लागू राहणार असल्याचं सांगितलं आहे. नागपूर खंडपीठाकडून १ नोव्हेंबरपर्यंत क्षमतेपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या डीजेंवर बंदी घालण्यात आली आहे.




**नांदेड** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते आ. रोहित पवार हे मराठवाड्याच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावर असताना नांदेड जिल्ह्यातील तळणी या गावी त्यांनी पिकांची पाहणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, 'युवक' चे अध्यक्ष धनंजय सूर्यवंशी आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# नांदेडमध्ये महापालिकेने वाटप केलेल्या ११ हजार प्रमाणपत्रांची चौकशी होणार -किरीट सोमय्या

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने जन्म व मृत्यूच्या प्रमाणपत्रातील नाव दुरुस्तीमधील गैरप्रकार झाला आहे. अशा ११ हजार प्रमाणपत्रांची चौकशी करणार असल्याचे नांदेड महापालिका प्रशासनाने मान्य केले आहे, अशी माहिती भाजपचे नेते व माजी खा. किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली आहे.




जन्म-मृत्यू प्रमाणपत्रातील नावात दुरुस्ती प्रक्रियेत राज्यभरात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला आहे. नावात सुधारणा करण्याच्या प्रक्रियेत राज्य सरकारने नवीन मार्गदर्शक सुचना केल्या आहेत. गेल्या दोन ते तीन वर्षांत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत नावात सुधारणा करण्याच्या कारणावरुन ११ हजार प्रमाणपत्र देण्यात आली आहेत. या प्रमाणपत्रामध्येही मोठा गैरप्रकार झालेला असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी किरीट सोमय्या यांनी महापालिका प्रशासनाकडे केली. या ११ हजार प्रमाणपत्रातील चौकशीमुळे नावात दुरुस्तीच्या प्रक्रियेमध्ये नेमके काय घडले हे समोर येणे गरजेचे आहे. आतापर्यंत राज्यात ६० एफआयआर दाखल झाले आहेत. आतापर्यंत ५ लाख प्रमाणपत्र रद्द झाले आहेत. नांदेड शहरात बीएलओंच्या चुकीमुळे जवळपास २५ हजार मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. काही बीएलओंनी घरी बसून काम केले असून खोटा अहवाल प्रशासनाकडे दाखल केला. त्यामुळे जवळपास २५ हजार मतदारांची नावे निवडणुकीच्या मतदार यादीतून वगळण्यात आली.

याप्रकरणी आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली असून तक्रार केली आहे. प्रशासनाने दोन बीएलओंना निलंबित केल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले. तत्पुर्वी किरीट सोमय्या यांनी भाजपच्या महापौर कविता संतोष मुळे यांची महापौर दालनात भेट घेवून चर्चा केली. यावेळी उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते अॅड. महेश कनकदंडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# शरद पवार शेतीच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– यंदा राज्यातील अनेक भागांमध्ये पुरेसा पाऊस न पडल्याने दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. आगामी काळात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारी यंत्रणांकडून वेगाने उपाययोजना राबवल्या जातील, यादृष्टीने चाचपणी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार हे राज्यातील दुष्काळी भागाचा दौरा करणार आहेत. २८ सप्टेंबरला शरद पवार हे दुष्काळी भागाचा दौरा करतील. काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती.



# गणेश विसर्जनावेळी बुडालेल्या तरूणांचे मृतदेह सापडले

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– वाघोली/वाडी पाटी नजीकच्या 'मातोश्री प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयात' बसवलेल्या सात दिवसांच्या श्री गणेशाचे विसर्जन करण्यासाठी गेलेल्या दोन विद्यार्थ्यांचा गोदावरी नदीच्या पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना रविवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विष्णूपुरी येथील काळेश्वर घाटावर घडली. या घटनेतील तरूणांचे मृतदेह सापडले आहेत.



देगलूर तालुक्यातील किनी येथील बजरंग बिरू येडुरे (वय १८) आणि मुखेड तालुक्यातील बाराहाळी येथील दीपक मारुती सोळुंके (वय २०) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे असून ते दोघेही मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत होते. रविवारी दुपारी मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयातील सात दिवसांच्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी हे विद्यार्थी एका खाजगी वाहनाने विष्णूपुरी येथील काळेश्वर घाटावर गेले होते. श्री विसर्जन झाल्यानंतर दोघेही पोहण्यासाठी गोदावरी नदीच्या पात्रात उतरले. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघेही पात्रात बुडाले.

रविवारी शोधमोहिमेदरम्यान जीवरक्षक दलाने बजरंग येडुरे या तरुणाचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, सोमवारी (२१ सप्टेंबर) सकाळी जीवरक्षक दलाचे सुभाष कुकडे व शेख हबीब यांनी दीपक सोळुंके या दुसऱ्या तरुणाचा मृतदेह शोधून बाहेर काढला.

दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले असून, नांदेड ग्रामीण पोलिसांनी घटनेची माहिती मृत विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांना दिली आहे.

# उमाप यांच्या पथकाची धाड; ४३ लाखांचा गुटखा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक स्थापन केले आहे. या पथकाने दि. २० सप्टेंबर रोजी इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फत्तेबुरुज भागातील एका घरावर छापा टाकून ४३ लाख ३३ हजार ८७४ रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त केला आहे.

शहरातील फत्तेबुरुज भागात प्रतिबंधित गुटख्याची अवैध साठवणूक व विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर डीआयजी यांच्या पथकाने ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात बाबा पान मसाला, राज निवास, रजनीगंधा, सिग्नेचर, आरएमडी, विमल, सुगंधी जर्दा, मिराज तंबाखू व इतर प्रतिबंधित पदार्थांचा समावेश आहे.

या प्रकरणी इतवारा भागातील अकबर चाऊस, खयूम खान आणि अथर या तिघांविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, पोहेकॉ प्रदीप खानसोळे, गणेश राठोड,



संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी केली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी डीआयजी कार्यालयाने 'खबर' हेल्पलाइन – ९१ ५० १०० १०० हा क्रमांक सुरू केला असून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध धंद्यांची माहिती या क्रमांकावर द्यावी, असे आवाहन उमाप यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# शासन कोणाचे अन् कोणासाठी?

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतकऱ्यांचा गौरव करणाऱ्या सरकारच्या धोरणांमध्ये मात्र शेतकरी कुठे आहे, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी योजना, अनुदाने आणि मदतीच्या घोषणा होत असल्या, तरी प्रत्यक्ष आर्थिक धोरणांचे आकडे वेगळेच चित्र दाखवत असतील, तर सरकारच्या शेतकरीविषयक संवेदनशीलतेची कसोटी घेणे अपरिहार्य ठरते. केंद्र सरकारने राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार २०१४ ते २०२६ या कालावधीत कॉर्पोरेट क्षेत्रातील सुमारे १० लाख कोटी रुपयांची कर्जे 'राइट ऑफ' अर्थात माफ करण्यात आली. याच काळात शेतकऱ्यांसाठी केंद्रस्तरावर एक रुपयाचीही कर्जमाफी झाली नसल्याचा दावा या आकडेवारीवर आधारित आहे. ही बाब केवळ आकड्यांची नाही; ती देशाच्या आर्थिक प्राधान्यक्रमांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. विशेष म्हणजे ही माहिती शासनाकडूनच देण्यात आली आहे यामुळे ती अधिकृत आहे. कर्ज 'राइट ऑफ' म्हणजे कर्जदाराला सरसकट कर्जमाफी मिळाली, असा सरळ अर्थ होत नाही. बँकांच्या लेखा प्रक्रियेत वसुलीची शक्यता कमी असलेल्या कर्जांची नोंद बदलण्याची ही प्रक्रिया आहे. हा शब्दाचा खेळ आहे. परंतु कर्जमाफी आणि राइट ऑफ यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. मात्र प्रश्न असा आहे की, आर्थिक संकटात सापडलेल्या मोठ्या उद्योगांना बँकिंग व्यवस्थेतून पुनर्रचना, राइट ऑफ किंवा अन्य मार्गांनी दिलासा मिळू शकतो, तर छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कर्जाच्या बाबतीत अशीच संवेदनशीलता का दिसत नाही? कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या तुलनेत कॉर्पोरेट क्षेत्राला होणारे कर्जवाटपही या विषमतेकडे लक्ष वेधते. उपलब्ध आकडेवारीनुसार कृषी क्षेत्राला कॉर्पोरेट आणि सेवा क्षेत्राच्या तुलनेत अत्यंत कमी कर्जाचे वाटप करण्यात आले आणि कार्पोरेट क्षेत्राला मात्र वाटप केलेले भले मोठे कर्ज सरसकट माफ करण्यात आले. कर्जाची गरज, उद्योगाचा आकार आणि आर्थिक व्यवहारातील फरक यामुळे ही तुलना तंतोतंत समान पातळीवर करता येणार नाही. तरीही शेतीच्या तुलनेत भांडवलाचा मोठा प्रवाह कॉर्पोरेट क्षेत्राकडे जात असल्याचे चित्र दुर्लक्षित करता येणार नाही. शेतकऱ्याचे संकट मात्र केवळ कर्जाच्या आकड्यात मोजता येत नाही. अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, महागडी बियाणे-खते, कीटकनाशके, मजुरी आणि बाजारातील अस्थिर भाव या सगळ्यांचा भार त्याच्या खांद्यावर आहे. पीक हातात येण्यापूर्वीच त्याच्यावर खर्चाचे कर्ज चढलेले असते. पीक आले तर भाव मिळत नाही आणि भाव मिळाला तर उत्पादन घटते, या दुष्टचक्रात शेतकरी अडकलेला आहे. अशा परिस्थितीत कर्जाचा हप्ता चुकला की बँकेची नोटीस, वसुलीचा तगादा आणि सामाजिक दबाव यांना त्याला सामोरे जावे लागते. याउलट मोठ्या कर्जदारांसाठी आर्थिक पुनर्रचना, कर्ज पुनर्गठन आणि विविध संस्थात्मक उपाययोजना उपलब्ध असतात. रिझर्व्ह बँकेने तणावग्रस्त कर्जदारांच्या पुनर्रचनेसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. अशा व्यवस्थेचा लाभ कोणाला किती मिळतो, याची पारदर्शक माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. नियम सर्वांसाठी असतील तर त्यांचा लाभ मिळण्याची संधीही आर्थिक दुर्बल घटकांना प्रत्यक्षात मिळाली पाहिजे. शेतकऱ्याला कर्जमाफी देणे हा प्रत्येक वेळी कायमस्वरूपी उपाय असेलच असे नाही. कर्जमाफीसोबत उत्पादन खर्च कमी करणे, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, पीकविमा सुधारणा, वेळेवर आणि पुरेसे पीककर्ज, सिंचन, साठवणूक आणि बाजारव्यवस्थेतील सुधारणा यांची गरज आहे. परंतु संकटाच्या काळात तातडीचा दिलासा देणे ही सरकारची जबाबदारी आहे. मोठ्या आर्थिक संस्थांना वाचवताना जर 'व्यवस्थेचे हित' हा युक्तिवाद केला जात असेल, तर अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याच्या जगण्याला व्यवस्थेचे हित का मानले जाऊ नये? शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाषणांमध्ये सहानुभूती आणि धोरणांमध्ये मात्र वेगळे प्राधान्यक्रम, ही विसंगती आता थांबली पाहिजे. शेतकऱ्याच्या कर्जाचा प्रश्न हा त्याच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे कॉर्पोरेट कर्जांच्या राइट ऑफची प्रक्रिया, कृषी कर्जाची वसुली, पुनर्गठन आणि शेतकऱ्यांना मिळणारा प्रत्यक्ष दिलासा याबाबत केंद्राने स्पष्ट, पारदर्शक आणि तुलनात्मक श्वेतपत्रिका जनतेसमोर ठेवावी. अर्थव्यवस्थेच्या वाढीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचला पाहिजे. उद्योगांना भांडवल आणि शेतकऱ्यांना केवळ आश्वासने, अशी व्यवस्था लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेशी सुसंगत ठरू शकत नाही. सरकारी आकडेवारीतून जर अशी विषमता दिसत असेल, तर तिचे स्पष्टीकरण देण्याची आणि धोरणांची फेरतपासणी करण्याची जबाबदारी सरकारची आहे.

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार!



महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात शिक्षणाची गंगा पोहचवून, ज्ञानाचा दिवा घरोघरी प्रज्वलित करणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा २२ सप्टेंबर हा जन्मदिन. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमध्ये सक्रिय असणाऱ्या भाऊरावांची शिक्षणाने पोषण, बुद्धिवादाने रूढिवादाचा अंत, समतेने विषमतेचे निर्मूलन आणि श्रमाला प्रतिष्ठा ही तत्वप्रणाली होती. कर्मवीरांचे जीवन म्हणजे एक विद्या-पीठ असून, जीवनात कोणतीही गोष्ट फुकट नको यासाठी 'कमवा आणि शिका' योजना राबवून लाखो गरीब मुलांमध्ये स्वाभिमान निर्माण करणारे आणि 'स्वावलंबी शिक्षण' हेच आमचे ब्रीद मानून शिक्षणाचा प्रसार करणारे कर्मवीर खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत.

आपल्या सामाजिक-शैक्षणिक कार्याने संत गाडगे महाराजांना प्रभावित करणाऱ्या कर्मवीरांनी 'प्रत्येक खेड्यात शाळा असली पाहिजे. विना शाळेचे एकही गाव महाराष्ट्रात असू नये. प्रत्येक नांगरापाठीमागे एक पदवीधर मनुष्य उभा राहिला पाहिजे' हे स्वप्न बाळगले आणि ते प्रत्यक्षात उतरविले देखील. कर्मवीर भाऊराव पाटील हे मराठी समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षण प्रसार करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली व तेथे भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून कमवा व शिका ही योजना सुरू करून मोठे काम केले. ते ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग होता. रयत शिक्षण संस्थेच्या म ाध्यमातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

कर्मवीर भाऊराव यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगोंडा पाटील असे होते तर आईचे नाव गंगाबाई. कर्नाटक राज्यात दक्षिण कन्नड जिल्ह्यातील मूडबिद्री हे मूळ गाव असणाऱ्या कर्मवीर यांचे पूर्वज नशीब आजमावण्यासाठी महाराष्ट्रात आले. ऐतवडे (जि. सांगली) येथे स्थिर झाल्यानंतर त्यांच्या घराण्यात पाटीलकी आली. त्यामुळे त्यांचे पूर्वीचे आडनाव देसाई हे नाव बदलले जाऊन पाटील हे नाव रूढ झाले. कोल्हापूर जिल्ह्यामधील हातकणंगले तालुक्यातील बाहुबली च्या डोंगरावर पार्श्वनाथ यांचे सुंदर भव्य स्मारक आहे. या डोंगराच्या कुशीत वसलेल्या कुंभोज या छोट्याशा गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी अश्विन शुद्ध पंचमी (ललित पंचमी) ला कर्मवीरांचा जन्म झाला. त्यांचे बालपण कुंभोज येथे गेले. भाऊरावांच्या आईला शिवाशिव चालत नसे. एवढे कर्मठ घराणे असले तरी भाऊराव लहानपणापासूनच बंडखोर होते. अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. बालपणी ते कुंभोजमधील अस्पृश्य मुलांच्यात खेळले असल्याने अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात राग होता. अस्पृश्य समाजातील लोकांना पाणी दिले जात नाही म्हणून त्यांनी एका विहिरीचा रहाट मोडून टाकला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगली जिल्ह्यातील विटा आणि इतरही काही गावात झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. तेव्हा त्यांची राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती. याच काळात त्यांच्यावर राजश्रीशाहूमहाराजांच्याविचारांचावकार्याचा प्रभाव पडला. यापुढील काळात भाऊराव पाटील साताऱ्यात जाऊन शिकवण्या घेऊ लागले. याच काळात त्यांनी मदवानमास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर आदी मंडळींबरोबर दुधगावात दुधगाव शिक्षण मंडळ स्थापन केले. याच संस्थेमार्फत सर्व जातिधर्मांच्या मुलांसाठी एक वसतिगृह ही त्यांनी सुरू केले.

रयत शिक्षण संस्थेचे बीज येथेच रोवले गेले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा जिल्ह्यातील काले या गावी केली. साताऱ्यात भाऊराव पाटील यांनी एक मोठे वसतिगृह स्थापन केले. पुढे त्यांनी ओगल्यांच्या काच कारखान्यात व किर्लोस्करांच्या नांगराच्या कारखान्यात काही काळ काम केले. याच दरम्यान त्यांचा सत्यशोधक समाजाच्या कार्याशी जवळून संबंध आला. स्वातंत्र्य चळवळीसाठी हजारो कार्यकर्तेतयार करणाऱ्या महाराष्ट्राच्या समाज परिवर्तनाच्या चळवळींच्या या ज्ञानदूतास विनम्र अभिवादन.

**–प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ जि. सांगली

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा : सामाजिक परिवर्तनाचे केंद्र




गावाच्या विकासाचा पाया केवळ शाळेच्या इमारतीत नसतो; तो विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, शिक्षकांच्या विचारात आणि समाजाच्या सहभागात घडत असतो.

राष्ट्राच्या विकासात समाजाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. काळ बदलतो, परिस्थिती बदलते, तंत्रज्ञान बदलते आणि त्याबरोबर समाजाच्या गरजाही बदलतात. मात्र, या बदलांच्या केंद्रस्थानी आजही शाळा आणि शिक्षक यांचे स्थान कायम आहे. विशेषतः ग्रामीण, दुर्गम आणि वाडी-वस्त्यांमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही केवळ चार भिंतींच्या आत चालणारी शिक्षणसंस्था नसून, ती गावाच्या सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाची केंद्रे आहेत. सुमारे सव्वीस वर्षांपूर्वी ग्रामीण प्राथमिक शाळेच्या सामाजिक भूमिकेवर मी लिहिलेला विचार आज पुन्हा आठवतो. त्या वेळी शाळेसमोर इमारत, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक साधनांची कमतरता, पालकांचा सहभाग आणि ग्रामीण समाजातील शिक्षणाबाबतची जागरूकता ही प्रमुख आव्हाने होती. आज यातील अनेक प्रश्नांचे स्वरूप बदलले असले तरी 'शाळा समाजासाठी काय करते?' आणि 'समाज शाळेसाठी काय करतो?' हा मूलभूत प्रश्न आजही तितकाच जिवंत आहे. प्राथमिक शाळेत मुलाला अक्षरज्ञान मिळते; परंतु त्याचबरोबर त्याला स्वच्छतेची सवय, शिस्त, सहकार्य, समानता, पर्यावरणप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि माणुसकीचे धडेही मिळतात. म्हणूनच प्राथमिक शाळा ही समाजाच्या भवितव्याची पहिली प्रयोगशाळा आहे.

आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान, विचारशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, कौशल्याधारित व सर्वांगीण शिक्षण यावर विशेष भर दिला जात आहे. म्हणूनच आजच्या जिल्हा परिषद शाळेचा प्रश्न केवळ मुलांना पुस्तकातील धडा शिकवला का? एवढ्यावर मर्यादित राहता कामा नये. त्याऐवजी मुलांना शिकण्याची क्षमता मिळाली का? प्रश्न विचारण्याची सवय लागली का? स्वतः विचार करून निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली का? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. गावातील शाळा ही गावाची सामूहिक जबाबदारी आहे. शाळेची इमारत शासनाची असली, शिक्षक शासनाचा कर्मचारी असला आणि अभ्यासक्रम शासनाने ठरविला असला, तरी विद्यार्थी हा संपूर्ण समाजाचा असतो. त्यामुळे पालक, ग्रामपंचायत, माजी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक नागरिक, शिक्षणप्रेमी आणि लोकप्रतिनिधी यांनी शाळेशी आपले नाते अधिक घट्ट करणे गरजेचे आहे.

आज शाळा विकासासाठी केवळ आर्थिक मदतीपेक्षा विचारांची आणि वेळेची गुंतवणूक अधिक महत्त्वाची आहे. एखादा पालक मुलांना पुस्तक वाचून दाखवतो, एखादा माजी विद्यार्थी संगणकाचे ज्ञान देतो, एखादा शेतकरी विद्यार्थ्यांना शेतीची माहिती देतो, एखादा कारागीर पारंपरिक कौशल्य शिकवतो तेव्हा शाळा खऱ्या अर्थाने समाजाशी जोडली जाते.

२००० सालच्या तुलनेत आजची शाळा पूर्णपणे बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, संगणक, डिजिटल वर्ग, शैक्षणिक व्हिडिओ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे ज्ञानाचे जग विद्यार्थ्यांच्या हातात आले आहे. महाराष्ट्रातही शिक्षणातील तंत्रज्ञान, डिजिटल साधने आणि शिक्षकांचे तंत्रज्ञान-कौशल्य वाढविण्याच्या उपक्रमांवर भर दिला जात आहे. परंतु येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. तंत्रज्ञान हे शिक्षकाचा पर्याय नसून शिक्षकाच्या हातातील प्रभावी साधन आहे. मोबाईल असणे म्हणजे डिजिटल शिक्षण नव्हे आणि इंटरनेट उपलब्ध असणे म्हणजे ज्ञान मिळणे नव्हे. मुलाने तंत्रज्ञानाचा वापर कशासाठी, किती आणि कसा करावा, हे शिकवणे ही आजच्या शिक्षकाची नवी जबाबदारी आहे.

उद्याच्या पिढीला कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख करून देताना तिच्याबरोबर मानवी बुद्धिमत्ता, विवेक, सर्जनशीलता, नैतिकता आणि माणुसकी यांचीही जपणूक करावी लागेल. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यांच्या घरातील भाषा आणि स्थानिक बोली ही अडचण नसून ज्ञानाची पहिली पायरी आहे. महाराष्ट्राच्या शालेय शिक्षणाच्या संदर्भात स्थानिक बोलीच्या आधाराने मराठीकडे विद्यार्थ्यांना सहज नेण्याच्या प्रयत्नांचाही उल्लेख सरकारी दस्तऐवजांत आढळतो. गावातील मुलाला त्याच्या शेताची, नदीची, मातीची, पिकांची, लोकपरंपरांची, सणांची आणि स्थानिक इतिहासाची माहिती असते. शिक्षकाने या अनुभवांना पाठ्यपुस्तकाशी जोडले, तर शिक्षण अधिक जिवंत होते. 'माझे गाव हीच माझी पहिली प्रयोगशाळा' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली पाहिजे.

प्राथमिक शिक्षकाची भूमिका आज पूर्वीपेक्षा व्यापक झाली आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकासाचाही मार्गदर्शक आहे. एखाद्या मुलाच्या घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असू शकते. काही मुलांना शिकण्यासाठी अतिरिक्त आधाराची गरज असू शकते. काही मुले आत्मविश्वासाच्या अभावामुळे मागे राहू शकतात. अशा वेळी शिक्षकाने केवळ हा विद्यार्थी कमजोर आहे असे न म्हणता या मुलाला पुढे आणण्यासाठी मी काय करू शकतो? असा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. आजच्या शिक्षणव्यवस्थेत शिक्षक हा बदलाचा केंद्रबिंदू असल्याचे राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक चर्चेतही अधोरेखित केले गेले आहे.

प्रत्येक मूल सारखे नसते. कोणाचे गणित चांगले असते, कोणाला चित्रकलेची आवड असते, कोणाला खेळाची, कोणाला वाचनाची, तर कोणाला प्रयोग करण्याची. म्हणूनच प्राथमिक शिक्षण म्हणजे सर्व मुलांना एका साच्यात बसविणे नव्हे; तर प्रत्येक मुलामधील वेगळ्या क्षमतेचा शोध घेणे होय. परीक्षेतील गुण महत्त्वाचे आहेत; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे आहे मुलाला प्रश्न पडतात का? तो प्रश्न विचारतो का? चूक झाली तर पुन्हा प्रयत्न करतो का? दुसऱ्याला मदत करतो का? समाजाबद्दल संवेदनशील आहे का? हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे.

प्राथमिक शाळेतून स्वच्छतेचा संस्कार सुरू झाला, तर त्याचा परिणाम संपूर्ण गावावर होतो. शाळेतील स्वच्छता, पाणी बचत, वृक्षसंवर्धन, प्लास्टिकमुक्त परिसर, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ शौचालये आणि पर्यावरणपूरक उपक्रम यांत विद्यार्थ्यांचा सहभाग असला पाहिजे. मुलांनी शाळेत शिकलेली एखादी चांगली सवय घरी नेली आणि पालकांनी ती स्वीकारली, तर शिक्षणाचा प्रभाव वर्गखोलीच्या बाहेर पोहोचतो. याच क्षणी शाळा सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनते. शासकीय शाळांबाबत समाजाचा विश्वास अधिक दृढ होणे ही आजची महत्त्वाची गरज आहे. शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण, पारदर्शकता, नियमित संवाद, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती आणि पालकांचा सहभाग वाढला तर हा विश्वास निश्चितच मजबूत होऊ शकतो. शाळेच्या प्रगतीची जबाबदारी केवळ मुख्याध्यापक किंवा शिक्षकांची नसते. ही माझ्या गावाची शाळा आहे ही भावना प्रत्येक गावकऱ्याच्या मनात निर्माण झाली पाहिजे. कारण शाळा चांगली झाली तर गाव चांगले होते; गाव चांगले झाले तर समाज मजबूत होतो आणि मजबूत समाजा-तूनच सक्षम राष्ट्राची निर्मिती होते. सव्वीस वर्षांपूर्वी १६ ऑक्टोबर २०२० रोजी विविध वृत्तपत्रांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सामाजिक भूमिकेविषयी मांडलेला विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. मात्र आज त्या विचाराला नवे तंत्रज्ञान, नवी शैक्षणिक धोरणे, डिजिटल साधने, कृत्रिम बुद्धिमत्ता, कौशल्याधारित शिक्षण आणि बदलते सामाजिक वास्तव यांची जोड मिळाली आहे.

आजची जिल्हा परिषद शाळा ही केवळ 'गरिबांच्या मुलांची शाळा' अशी ओळख न राहता गुणवत्तापूर्ण, समावेशक, तंत्रज्ञानस्नेही आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची शाळा बनली पाहिजे. शाळेच्या भिंतीवर मोठ्या अक्षरांत लिहिलेले ज्ञान हेच शक्तीचे साधन आहे. हे वाक्य केवळ घोषवाक्य न राहता प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात उतरले, तरच शिक्षणाचे खरे सार्थक होईल. कारण शाळा म्हणजे इमारत नाही, शिक्षक म्हणजे केवळ कर्मचारी नाही आणि विद्यार्थी म्हणजे केवळ परीक्षार्थी नाही. शाळा म्हणजे समाजाच्या उद्याची पेरणी, शिक्षक म्हणजे त्या पेरणीचा संस्कारशील शेतकरी, आणि विद्यार्थी म्हणजे उद्याच्या समाजाचे अंकुरलेले भविष्य!

**– पंडित पवळे**
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

# अभियांत्रिकीचे नवे युग : मानवतेच्या भविष्यास आकार देणाऱ्या क्रांतिकारी नवकल्पना

आजचे युग वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे आहे. अभियांत्रिकी म्हटले की पूर्वी पूल, रस्ते, इमारती, धरणे किंवा पारंपरिक यंत्रसामग्री एवढेच चित्र डोळ्यांसमोर उभे राहत असे. मात्र, आता अभियांत्रिकीची व्याप्ती त्यापलीकडे गेली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (I), क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, अंतराळ तंत्रज्ञान, नॅनो-तंत्रज्ञान आणि शून्य-कार्बन तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत अभियंते नवनवीन प्रयोग करत आहेत. आजचा अभियंता केवळ काहीतरी निर्माण करणारा तंत्रज्ञ राहिलेला नाही; तर मानवाचे जीवन अधिक सुरक्षित, सुलभ आणि शाश्वत बनविण्यासोबतच पृथ्वीच्या भवितव्याचे रक्षण करणारा नवोन्मेषक म्हणून त्याची भूमिका विकसित होत आहे. भारतामध्ये दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस महान अभियंता आणि भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त 'अभियंता दिन' म्हणून साजरा केला जातो. देशाच्या विकासात अभियंत्यांचे योगदान, त्यांची कल्पकता, संशोधनवृत्ती आणि अथक परिश्रम यांचा गौरव करण्याचा हा दिवस आहे. या निमित्ताने अभियांत्रिकी क्षेत्रात आकार घेत असलेल्या काही भविष्यवेधी तंत्रज्ञानांकडे नजर टाकूया.

**स्ट्रक्चरल बॅटरी कंपोझिट्स : वाहनाची बॉडीच बनेल बॅटरी!**

इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे ते बॅटरीचे वजन. मोठ्या बॅटरीमुळे वाहनाचे वजन वाढते आणि त्याचा कार्यक्षमतेवर परिणाम होतो. या समस्येवर उपाय म्हणून ङ्गस्ट्रक्चरल बॅटरीफ ही संकल्पना पुढे आली आहे. या तंत्रज्ञानामध्ये वाहनाच्या काही संरचनात्मक भागांमध्येच ऊर्जा साठविण्याची क्षमता निर्माण केली जाते. उदाहरणार्थ, कारचे छत, दरवाजे किंवा अन्य संरचनात्मक भाग बॅटरीसारखे कार्य करू शकतात. कार्बन फायबरसारखे मजबूत आणि हलके पदार्थ संरचनेला मजबुती देतानाच ऊर्जा साठविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात. यामुळे स्वतंत्र आणि जड बॅटरी पॅकवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. परिणामी, इलेक्ट्रिक वाहनांचे वजन कमी होऊन त्यांची कार्यक्षमता आणि प्रवासक्षमता वाढण्याची शक्यता आहे. भविष्यात विमान, स्मार्टफोन आणि अन्य हलक्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्येही या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो.

**क्वांटम कॉम्प्युटिंग : संगणकांच्या क्षमतेला नवे क्षितिज**

पारंपरिक संगणकांमध्ये माहितीचे प्रतिनिधित्व ङ्गबिटफच्या माध्यमातून ० किंवा १ अशा दोन स्थितींमध्ये केले जाते. मात्र, क्वांटम संगणकांमध्ये ङ्गक्यूबिटफ या एककाचा वापर होतो. क्वांटम भौतिकशास्त्रातील सुपरपोझिशनसारख्या तत्त्वांमुळे क्यूबिट्स विशिष्ट परिस्थितीत एकापेक्षा अधिक स्थितींचे प्रतिनिधित्व करू शकतात. त्यामुळे काही प्रकारच्या अत्यंत गुंतागुंतीच्या गणना पारंपरिक संगणकांच्या तुलनेत वेगळ्या पद्धतीने आणि अधिक कार्यक्षमतेने सोडविण्याची क्षमता क्वांटम संगणकांमध्ये आहे. क्यूबिट्स अत्यंत संवेदनशील असल्यामुळे त्यांना स्थिर ठेवण्यासाठी नियंत्रित वातावरण आणि अनेकदा अत्यंत कमी तापमानाची आवश्यकता असते. त्यासाठी क्रायोजेनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. औषधनिर्मिती, नवीन पदार्थांचा शोध, हवामान मॉडेलिंग, क्रिप्टोग्राफी आणि गुंतागुंतीच्या वैज्ञानिक गणनांमध्ये भविष्यात क्वांटम कॉम्प्युटिंगचा मोठा प्रभाव पडू शकतो.

**बायोहायब्रिड रोबोटिक्स : यंत्रात जीवशास्त्राचा संगम**

रोबोट म्हटले की धातू, प्लास्टिक आणि इलेक्ट्रॉनिक भागांनी बनलेली यंत्रे आपल्या डोळ्यांसमोर येतात. मात्र, बायोहायब्रिड रोबोटिक्स ही संकल्पना या पारंपरिक कल्पनेलाच आव्हान देत आहे. या तंत्रज्ञानात यांत्रिक संरचनेसह जिवंत पेशींचाही वापर केला जातो. प्रयोगशाळेत विकसित केलेल्या स्नायूंच्या पेशी कृत्रिम सांगाड्यावर बसवून त्यांना विद्युत किंवा प्रकाशाच्या संकेतांनी नियंत्रित करण्याचे प्रयोग सुरू आहेत. जिवंत स्नायूंच्या नैसर्गिक आकुंचन-प्रसरणाचा उपयोग केल्यामुळे अतिशय सूक्ष्म आणि लवचिक हालचाली करणारे रोबोट विकसित करण्याची शक्यता आहे. विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात या तंत्रज्ञानाला मोठी क्षमता आहे. भविष्यात शरीराच्या अतिशय सूक्ष्म भागांपर्यंत पो-होचणे, औषधांचा लक्ष्यित पुरवठा करणे किंवा विशिष्ट वैद्यकीय प्रक्रियांमध्ये मदत करणे यासाठी सूक्ष्म बायोहायब्रिड रोबोट उपयोगी ठरू शकतात.

**महासागरातील औष्णिक ऊर्जा : समुद्रातून अखंड ऊर्जानिर्मिती**

नवीकरणीय ऊर्जेच्या शोधात सौर आणि पवन ऊर्जेबरोबरच महासागरही भविष्यात महत्त्वाचा ऊर्जा स्रोत ठरू शकतो. महासागरातील औष्णिक ऊर्जा रूपांतरण या तंत्रज्ञानात समुद्राच्या पृष्ठभागावरील उबदार पाणी आणि खोल समुद्रा-तील थंड पाणी यांच्यातील तापमानातील फरकाचा उपयोग केला जातो. या तापमान फरकाच्या साहाय्याने कार्यकारी द्रवाचे बाष्पीभवन करून टर्बाइन चालवली जाऊ शकते आणि त्यातून वीज निर्माण केली जाते. या तंत्रज्ञानाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सौर ऊर्जेप्रमाणे केवळ दिवसाच्या प्रकाशावर त्याचे उत्पादन अवलंबून नसते. योग्य परिस्थितीत दिवस-रात्र सातत्याने ऊर्जा निर्मिती करण्याची क्षमता त्यात आहे. याशिवाय काही प्रणालींमधून गोडे पाणी मिळविण्याची शक्यताही आहे. त्यामुळे ऊर्जा आणि पाणी या दोन्ही समस्यांवर एकाच वेळी उपाय शोधण्याच्या दृष्टीने हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरू शकते.

**४डी प्रिंटिंग : बदलत्या परिस्थितीनुसार आकार बदलणारे पदार्थ**

३डी प्रिंटिंगने उत्पादन क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला. आता त्यापुढचे पाऊल म्हणजे ४डी प्रिंटिंग. या तंत्रज्ञानामध्ये अशा स्मार्ट पदार्थांचा वापर केला जातो, जे तापमान, आर्द्रता, प्रकाश किंवा इतर बाह्य परिस्थितींमध्ये बदल झाल्यानंतर स्वतःचा आकार किंवा रचना बदलू शकतात. कल्पना कराभविष्यात तापमान किंवा पाण्याच्या दाबानुसार स्वतःचा आकार बदलणारी पाइपलाइन तयार झाली तर? विशिष्ट परिस्थितीत ती आकुंचन पावू किंवा विस्तारू शकते. वैद्यकीय उपकरणे, स्मार्ट वस्तू, बांधकाम, अंतराळ तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादन अशा विविध क्षेत्रांमध्ये ४डी प्रिंटिंगचा वापर वाढण्याची शक्यता आहे.

**अंतराळातील कचरा : आता रोबोट करतील स्वच्छता!**

अंतराळात कार्यरत असलेल्या उपग्रहांची संख्या वाढत असताना जुन्या उपग्रहांचे अवशेष, रॉकेटचे तुकडे आणि इतर वस्तूंचे प्रमाणही वाढत आहे. या अंतराळातील कचऱ्यामुळे कार्यरत उपग्रह आणि अंतराळयानांना गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच अंतराळातील कचरा ओळखणे, त्याचा मागोवा घेणे आणि सुरक्षितपणे हटविणे यासाठी विविध तंत्रज्ञान विकसित केले जात आहे. रोबोटिक यंत्रणा, पकडणारे यांत्रिक हात, जाळ्यासारख्या प्रणाली आणि लेझर-आधारित मार्गदर्शन तंत्रज्ञानाचा वापर करून कक्षेत फिरणाऱ्या अवशेषांवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात अंतराळातील कचरा नियंत्रित करण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविल्या गेल्यास उपग्रहांचे संरक्षण आणि अंतराळ मोहिमांची सुरक्षितता वाढण्यास मदत होऊ शकते.

**सेल्फ-हीलिंग काँक्रीट : भेगा पडल्या तरी काँक्रीट स्वतःच दुरुस्त होणार!**

रस्ते, पूल, धरणे आणि इमारतींच्या देखभालीतील मोठी समस्या म्हणजे काँक्रीटमध्ये कालांतराने निर्माण होणाऱ्या भेगा. सुरुवातीला या भेगा लहान असल्या तरी त्यातून पाणी आत शिरल्यास संरचनेचे नुकसान वाढू शकते. या समस्येवर उपाय म्हणून अभियंते 'सेल्फ-हीलिंग काँक्रीट' विकसित करण्यावर काम करत आहेत. या तंत्रज्ञानात काँक्रीटमध्ये विशिष्ट जीवाणू आणि त्यांना आवश्यक पोषक घटक सूक्ष्म कॅप्सूलच्या स्वरूपात मिसळले जातात. काँक्रीटमध्ये भेग निर्माण होऊन त्यात पाणी प्रवेश केल्यानंतर काही विशिष्ट जीवाणू सक्रिय होतात. त्यांच्या जैविक प्रक्रियेतून चुनखडीसारखा पदार्थ तयार होऊन भेग भरून येण्यास मदत होते. या तंत्रज्ञानामुळे काँक्रीटची टिकाऊपणा वाढविणे आणि वारंवार करावी लागणारी दुरुस्ती कमी करणे शक्य होऊ शकते. भविष्यात पायाभूत सुविधांच्या देखभाल खर्चातही मोठी बचत होण्याची अपेक्षा आहे.

**अभियंता : केवळ निर्माता नव्हे, तर भविष्याचा शिल्पकार!**

अंतराळातील कचरा हटविणाऱ्या रोबोटपासून स्वतःच्या भेगा भरून घेणाऱ्या काँक्रीटपर्यंत आणि क्वांटम संगणकांपासून जिवंत पेशींचा वापर करणाऱ्या रोबोटपर्यंतअभियांत्रिकीची वाटचाल आज अभूतपूर्व वेगाने होत आहे. सर एम. विश्वेश्वरय्या यांनी विकासाच्या ज्या दूरदृष्टीची पायाभरणी केली, तिचा विस्तार आजची अभियंत्यांची पिढी अंतराळापासून सूक्ष्म जैविक जगापर्यंत करत आहे. अभियांत्रिकी म्हणजे केवळ यंत्रे आणि इमारती उभारणे नाही; तर भविष्यातील जग अधिक सुरक्षित, सक्षम, पर्यावरणपूरक आणि मानवी जीवनासाठी उपयुक्त बनविण्याची जबाबदारी आहे. म्हणूनच आजचा अभियंता हा केवळ निर्माता नाही, तर नवकल्पनांचा शिल्पकार आणि मानवतेच्या उज्ज्वल भवितव्याचा रक्षक आहे.

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# विविध बोलींनी हिंदी भाषा समृद्ध होत गेली -डॉ. निहलानी

## पीपल्स कॉलेजमध्ये हिंदी दिन उत्साहात; हास्य-व्यंग्य रचनांनी रंगला कार्यक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतातील विविध प्रदेशांमध्ये हिंदी वेगवेगळ्या स्वरूपात बोलली जाते. स्थानिक बोलींमधील अनेक शब्द हिंदीने आत्मसात केल्याने लोकांच्या वापरातून हिंदी भाषा सातत्याने समृद्ध होत गेली, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहिःस्थ शिक्षण विभागाचे संचालक तथा हास्य-व्यंग्य कवी डॉ. प्रकाश निहलानी यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेजच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पीपल्स कट्ट्यावर हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विकास सुकाळे होते. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

हिंदी ही भारताची बिंदी आहे, असे सांगत डॉ. निहलानी यांनी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा अभिमान बाळगत हिंदीसह अन्य भारतीय भाषांचाही अभ्यास करावा, असे आवाहन केले. त्यांनी नदी और सागर का मिलाप, डॉक्टर को देखने का समय यांसह हास्य-व्यंग्य रचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. फौजी और अनपढ़ लड़की या सादरीकरणालाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी मराठी माझी आई आहे, तर हिंदी माझी मावशी आहे, असे सांगत सर्व भारतीय भाषांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी हिंदी कविता तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार केलेले गीत सादर केले. प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

हिंदी दिनानिमित्त विद्यार्थिनींनी हिंदीतील प्रथम महिला साहित्यिकांची माहिती देणारे भित्तिपत्रक सादर केले. तसेच सायबर गुन्ह्यांवर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. राजेश्वरी अन्नदाते, ज्योती जोगपेठे व प्रांजली जवळेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. आम्रपाली कसबे यांच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एन. जाधव यांनी केले. डॉ. माया भालेराव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. आम्रपाली कसबे यांनी तर आभार प्रा. विजय कदम यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास प्रा. डॉ. मुकुंद कवडे, प्रा. डॉ. सुनिता माळी, प्रा डॉ. पुनम लोहाना, प्रा. डॉ. राजेश सोनकांबळे, प्रा. कल्पना जाधव, डॉ. मिर्झा, डॉ. आनंद थोरात, प्रा. पी. पी. चौधरी, प्रा. जी. डी. तडोड, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, प्रा. डॉ. विनायक देव, प्रा. किरण बीचकुंदे, प्रा. आदित्य गोडबोले, डॉ. सुप्रिया गायकवाड, डॉ. वर्षा मोरे, प्रा. डॉ. प्रीती यादव तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचून शासकीय सेवा देण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे निर्देश




**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय योजनांचा आणि विविध विभागांच्या सेवांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत भोकर तालुक्यातील स्मार्ट ग्रामपंचायत हाडोळी येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी भेट दिली. यावेळी वृक्षारोपण, विविध दाखल्यांचे वितरण, घरकुलांना भेटी, महिला बचत गटांना कर्जाचा धनादेश तसेच विविध शासकीय संस्थांना भेटी देऊन अभियानाला सुरुवात करण्यात आली.

अभियानांतर्गत ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणारे जन्म, मृत्यू व विवाह प्रमाणपत्रे लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली. घरकुलांना भेट देऊन आशीर्वादाचा दिवा प्रज्वलित करण्यात आला. महिला बचत गटाला कर्जाचा धनादेश देण्यात आला. तसेच प्राथमिक शाळा, अंगणवाडी, आरोग्य उपकेंद्र आणि ग्रामपंचायतीला भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

एकही लाभार्थी शासकीय सेवेपासून वंचित राहू नय, या उद्देशाने सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले. गरोदर मातांच्या नोंदणीसाठी अंगणवाडी सेविका आणि आशा स्वयंसेविकांमध्ये प्रभावी समन्वय साधावा. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभापासून कोणतीही माता वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. आयुष्मान भारत कार्डची नोंदणी व जनजागृती वाढवावी, शालेय विद्यार्थ्यांची MBU नोंदणी पूर्ण करावी तसेच ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणारे प्रलंबित दाखले तातडीने वितरित करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

शासकीय यंत्रणा केवळ कार्यालयात न राहता प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचली पाहिजे. विविध विभागांमध्ये समन्वय साधून सेवा देण्याची प्रक्रिया गतिमान केल्यास सेवा संकल्प अभियान अधिक प्रभावीपणे यशस्वी होईल, असेही पाटील यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी हाडोळी येथील आरोग्य उपकेंद्रासही भेट देऊन पाहणी केली. नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये गळती होत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी संबंधित कंत्राटदाराला बांधकामातील दोष दुरुस्तीच्या दायित्व कालावधीत गळतीची दुरुस्ती तातडीने करून देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

यावेळी भोकर पंचायत समितीचे थगट विकास अधिकारी शेखर देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जाधव, उपविभागीय अभियंता शिंदे, बाल विकास प्रकल्प अधिकारी चाटलावर, शिक्षण अधिकारी तरवडे, विस्तार अधिकारी गोणशेटवार, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती गोवंडे यांच्यासह ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच अनिता माधवराव अमृतवाड, उपसरपंच अनुसयाबाई रामराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य अशोक दुधारे, विजयादशमी कृष्णुरे, संगीता रामराव भालेराव, दुर्गा हरिदास किनेवाड, तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला बचत गटांच्या सदस्या आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत १३ गावांत 'एक गाव एक गणपती'

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत तेरा गावांत 'एक गाव एक गणपती' मोहीम राबविण्यात आली असून गणेशोत्सव काळात हद्दीत दैनंदिन पोलीस गस्त करण्यात येत आहे.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या एकूण ३२ गावातील ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामीण भागात परवानाधारक एकूण २५ तर विनापरवाना ६३ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे तर शहरी भागांत ५७ तर विनापरवाना २९ गणेश मंडळांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. एकूण १७४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी श्री गणेश मूर्तीची स्थापना केली आहे.



जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केलेल्या एक गाव एक गणपती या मोहिमेला १३ गावांत प्रतिसाद मिळाला आहे.

गुंडेगाव, लालवाडी, पिंपळगाव मिश्री, पिंपळगाव निमजी, बोंढार तर्फेहवेली, सिद्धनाथ, वांगी, कल्हाळ, गंगाबेट, खुपसरवाडी, धनगरवाडी, वाहेगाव, भनगी या गावात एक गाव एक गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्याकडून बसविण्यात आले असून यासाठी गावातील आजी, माजी सरपंच, उपसरपंच, तंटामुक्त अध्यक्ष यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक यांच्या पुढाकाराने व पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी वेळोवेळी गणेशोत्सव मंडळांना दिलेल्या सुचनांचे पालन करीत ही मोहीम राबविण्यात आली असून यासाठी गोपनीय शाखेचे अमलदार बालाजी दंतापल्ले, बालाप्रसाद टरके, होमगार्ड माधव पुयड यांनी सहकार्य केले.

# बालकामगार निर्मूलनार्थ विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)-बालकामगार निर्मूलनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'सहायक कामगार आयुक्त कार्यालय, नांदेड'च्या वतीने जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यात इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, तर इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी केले आहे.

प्रत्येक शाळेने तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी (इयत्ता ५ वी ते ७ वी) कमाल १० विद्यार्थ्यांची, तसेच निबंध स्पर्धेसाठी (इयत्ता ८ वी ते १० वी) कमाल १० विद्यार्थ्यांची नावे २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत पाठवावीत. अर्जात विद्यार्थ्याचे पूर्ण नाव, इयत्ता, शाळेचे नाव, मुख्याध्यापक किंवा शिक्षकांचा मोबाईल क्रमांक, पालकांचा मोबाईल क्रमांक आणि उपलब्ध असल्यास विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक ही माहिती असणे आवश्यक आहे. ही माहिती ८०८०४७२१९०, ९७६७६०१३१८, ८९७५९७६९४९ या व्हॉट्सप/मोबाईल क्रमांकांवर किंवा alcnandedgmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावी.

# अक्षरांनी जाळ धरला अन् स्वप्नांचे निखारे झाले -एकनाथ मोरे

**लोहा (प्रतिनिधी)–** ३८ पदव्या मिळवून आणि १०७ विद्यापीठांमध्ये ज्ञानोपासना करणारे डॉ. गोविंद नांदेडे हे झोपडीत जन्म लेले एक महान व्यक्तिमत्त्व आहे. आईला पहिली गुरू मानणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचा ज्ञानप्रवास निरंतर सुरू आहे. त्यांच्या अक्षरांनी जाळ धरला, मनात ज्ञानाचा ज्वालामुखी उफाळून आला आणि शब्दांचे निखारे झाले. यातून निर्माण झालेला ज्ञान व विचारांचा अंगार आज जगभर पसरला आहे, अशा शब्दांत राज्याचे माजी ग्रामविकास सहसचिव एकनाथ मोरे यांनी डॉ. गोविंद नांदेडे यांचे कौतुक केले.



निमित्त होते मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे. तालुक्यातील रायवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने डॉ. गोविंद नांदेडे यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच गोविंदराव विभुते हे होते. तर व्यासपीठावर प्रशासक सत्वशीला माचेवाड, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी कपाळे, मलंग शेख, हुसेन शेख, मुख्याध्यापक बी. टी. केंद्रे, बापू गायखर, सुमनबाई गिरी, सोपान गौंड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नागरी सन्मानपत्र स्वीकारल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. गोविंद नांदेडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी नेहमी मोठी स्वप्ने पाहावीत आणि अहोरात्र अभ्यास करावा. माझ्या कार्यकाळात '१८ तास अभ्यास' असा उपक्रम राबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचे आवाहन केले होते, त्याला राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.

पुढे बोलताना ते म्हणाले की, 'राय' म्हणजे बुद्धी! बुद्धीची भूमी असलेल्या रायवाडी गावाला आध्यात्मिक आणि शैक्षणिक केंद्र बनवले आहे. सर्वधर्मीय लोक येथे गुण्यागोविंदाने नांदतात, हेच या गावाचे खरे वैभव आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन वैजनाथ पांचाळ यांनी केले, तर मानपत्राचे वाचन बापू गायखर यांनी केले.

# गोमासाच्या संशयावरून आयशर अडवून चालकाला मारहाण

## वाहन तपासले असता निघाला लसणाचा माल; कार्ला फाट्यावरील प्रकार

**नायगाव (प्रतिनिधी)–** जनावरे अथवा गोमांसाची वाहतूक होत असल्याच्या संशयावरून आयशर टेम्पो अडवून चालकाला मारहाण केल्याची घटना नरसी-बोधन मार्गावरील कार्ला फाट्यावर रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या घटनेत चालक जखमी झाला असून, त्याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठविण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, नरसीहून बिलोलीकडे जाणाऱ्या आयशर टेम्पोमधून जनावरे अथवा गोमांसाची वाहतूक होत असल्याचा संशय काही व्यक्तींना आला. त्यामुळे कार्ला फाट्याजवळ टेम्पो अडविण्यात आला. यावेळी चालकाला मारहाण झाल्याचे सांगण्यात आले.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रोकडे यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये जनावरे किंवा मांस आढळून आले नाही. टेम्पोमध्ये लसणाचा माल असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले.

मारहाणीत जखमी झालेल्या चालकावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला नांदेड येथे हलविण्यात आले. घटनेप्रकरणी संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू असून, मारहाणीच्या प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी दिली.

या घटनेमुळे कार्ला फाटा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संशयाच्या आधारे वाहन अडवून कायदा हातात घेण्याऐवजी अशा प्रकारची माहिती थेट पोलिसांना देणे आवश्यक असल्याची चर्चा परिसरात होत आहे.

# मराठवाडा शिक्षक संघाची नांदेड येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने नांदेड येथे शिक्षक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. बदलती शैक्षणिक परिस्थिती, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, संघटनात्मक बांधणी, शिक्षकांवरील वाढता प्रशासकीय ताण तसेच पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांवर यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध साहित्यिक अरविंद जगताप, प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे, सिनेट सदस्य प्रा. डॉ. उमाकांत राठोड, उपप्राचार्य बालाजी कोंपलवार तसेच मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार सुशील घोटे पाटील उपस्थित होते.



प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी संघटना ही केवळ मागण्यांसाठी संघर्ष करणारी यंत्रणा नसून शिक्षकांच्या प्रश्नांना वैचारिक दिशा देणारी शक्ती असल्याचे सांगितले. संघटनात्मक बांधणीसाठी सातत्य, विचार, संवाद आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रसिद्ध साहित्यिक अरविंद जगताप यांनी शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकविणारा घटक नसून समाजाच्या वैचारिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक असल्याचे सांगितले.

सिनेट सदस्य प्रा. डॉ. उमाकांत राठोड यांनी शिक्षण क्षेत्रातील बदलांचा अभ्यास करून शिक्षकांनी आपल्या हक्कांसोबतच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीही सक्रिय भूमिका बजावण्याची गरज व्यक्त केली.

चंद्रकांत चव्हाण यांनी शिक्षकांच्या दैनंदिन अडचणी, वाढता प्रशासकीय हस्तक्षेप आणि शिक्षकांच्या सन्मानाच्या प्रश्नांवर संघटितपणे आवाज उठविण्याची आवश्यकता व्यक्त केली. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटनात्मक एकजूट अधिक मजबूत करण्याची गरज अधोरेखित करताना, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार सुशील घोटे पाटील यांच्या विजयासाठी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी संघटनेची ताकद अधिक व्यापक करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांनी शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी संघटना सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे सांगून शिक्षकांनी संघटित आणि सक्रिय राहण्याचे आवाहन केले.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार -पोनि मांजरमकर



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** उत्सवांच्या नावाखाली डीजेचा दणदणाट व कर्णकर्कश आवाज तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी शांतता समितीच्या बैठकीत बोलताना सांगितले.

गणपती व आगामी उत्सव शांततेत पार पडावेत या करिता अर्धापूर तालुक्यातील निमगाव येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी चेअरमन अनिल मोळके हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी सुनीता चाभरेकर, पोउनि. भीमराव राठोड, कृषी विस्तार अधिकारी गिरधारी मोळके, मुख्याध्यापक जी. पी. सूर्यवंशी, केसर राठोड, महेश देशमुख, पोलीस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष राऊत आदी होते.

अर्धापूर तालुक्यातील नव्याने समावेश करण्यात आलेल्या सात गावातील पोलीस पाटील यांच्या वतीने सदरील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचा सत्कार पोलीस पाटील यांच्याकडून करण्यात आला.

या बैठकीस निमगाव, चोरंबा, सोनाळा, खैरगाव, रोडगी, सायलवाडी, देशमुख वाडी, चाभरातांडा येथील पोलीस पाटील व गणेश मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी जी. पी. मोळके, जी. पी. सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस पाटील कान्होजी मोळके यांनी केले. सूत्रसंचालन दिगंबर मोळके यांनी केले तर आभार पोलीस पाटील अंजनराव नरोटे यांनी मानले.

# घुंगराळ्यात स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर करण्याची मागणी

**नायगाव (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील घुंगराळा व परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर पशुपालनावर अवलंबून आहेत. मात्र, घुंगराळा येथे स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना नसल्याने पशुधनाच्या उपचारासाठी शेतकऱ्यांना १० ते १५ किलोमीटर अंतर कापून जावे लागत आहे. त्यामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच शेतकऱ्यांना आर्थिक फटकाही सहन करावा लागत आहे.

घुंगराळा हे तालुक्यातील मोठे गाव असून, परिसरातील अनेक गावांतील शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात. दुभती जनावरे, शेळ्या, बैल आदी पशुधनावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. जनावर आजारी पडल्यास किंवा अचानक उपचाराची गरज भासल्यास जवळपास पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची मोठी धावपळ होते. विशेषतः रात्रीच्या वेळी ही अडचण अधिक गंभीर बनते.

या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता पार्टी मोर्चा (अनुसूचित जमाती) चे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष मोहनराव तुरटवाड यांनी राज्याच्या पशुसंवर्धन व ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी घुंगराळा येथे स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

घुंगराळा येथे स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखान्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी मोहनराव तुरटवाड यांनी या निवेदनान्वये केली आहे. या मागणीमुळे परिसरातील शेतकऱ्यांना पशुवैद्यकीय सुविधा गावाच्या जवळ उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राजीव गांधी विद्यालयात एसएससी गुणवंतांचा सत्कार

**नायगाव (प्रतिनिधी)–** मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरारी घ्यावी. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे कौतुक केल्याने त्यांना पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा मिळते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी संस्था सदैव त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही संस्थेचे अध्यक्ष मनोज रावसाहेब मोरे पाटील यांनी दिली.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर रोजी वजीरगाव येथील राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत गुणवत्तापूर्ण यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा घेण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मनोज मोरे पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस, प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



विद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम पाच क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ७ हजार, ६ हजार, ५ हजार, ४ हजार आणि ३ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले. तसेच ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिकृती, शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन पालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये कु. समीक्षा दिलीप मोरे हिने प्रथम, कु. संतोषी राजेश ढगे हिने द्वितीय, गणेश शेषराव ढगे याने तृतीय, भागवत व्यंकटी कवळे याने चतुर्थ तर कु. विजया गणेश ढगे हिने पंचम क्रमांक पटकावला. तसेच कु. वेदिका ईश्वर पांचाळ हिचा शिष्यवृत्तीधारक म्हणून विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी माजी सरपंच नागोराव पाटील ढगे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचेही त्यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक संतोष निकलपुरे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, उत्तमराव पा. ढगे, हनमंत पा. ढगे, बाबाराव पा. ढगे, माणिका पा. ढगे, जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष पानपट्टे, केंद्रप्रमुख पंडितराव ढगे, नागोराव पा. ढगे, आनंदराव पाटील ढगे, कोंडीबा भदरगे, आबजी पाटील ढगे, संजय पाटील ढगे यासह पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

CMYK

# शिवार

# मधुमक्षिका पालन !

## कमी खर्चात जास्त नफा देणारा शेतीपूरक व्यवसाय !

**शेतीपुरक व्यवसायामध्ये विविध प्राणी, कीटक यांच्या मदतीने नफा मिळवून आज उत्पादनाचे नवे मार्ग उघडे झाले आहेत. मधुमक्षीका पालन हा त्यातलाच एक शाश्वत मार्ग आहे. या व्यवसायाच्या सहाय्याने शेतकरी कमी जागेत, कमी भांडवलात चांगला नफा मिळवून देणारा व्यवसाय करू शकतात. तसेच मधुमक्षीका पालनासाठी राज्य सरकारही शेतकऱ्यांना अनुदान देते. त्यामुळे हा व्यवसाय शेतकऱ्यांना फायदेशीर ठरतो.**

### मधुमक्षिका पालन म्हणजे काय?

मधुमक्षीकापालन म्हणजे लाकडी पेट्यांमध्ये मधमाशा (मधुमक्षिका) पाळून त्यांच्याकडून मध मिळवण्याची प्रक्रिया. मधमाशांच्या या पेट्यांमध्ये दोन दालन असतात. मधमाशांचा वंश वाढवण्यासाठी खालचे दालन आणि मध साठवण्यासाठीचे वरचे दालन. यामध्ये बाहेर काढता येणाऱ्या लाकडी चौकटी असतात. या लाकडी चौकटींमध्ये मधुमक्षीका मेणाची पोळी बांधतात. या पोळ्यामधून मधकाढणी यंत्राच्या सहाय्याने मध काढून घेतल्यानंतर रिकामी झालेली पोळी पुन्हा भरण्यासाठी त्या दालनात परत ठेवली जातात.



### मधुमक्षिका पालन म्हणजे काय?

मधुमक्षीकापालन म्हणजे लाकडी पेट्यांमध्ये मधमाशा (मधुमक्षिका) पाळून त्यांच्याकडून मध मिळवण्याची प्रक्रिया. मधमाशांच्या या पेट्यांमध्ये दोन दालन असतात. मधमाशांचा वंश वाढवण्यासाठी खालचे दालन आणि मध साठवण्यासाठीचे वरचे दालन. यामध्ये बाहेर काढता येणाऱ्या लाकडी चौकटी असतात. या लाकडी चौकटींमध्ये मधुमक्षीका मेणाची पोळी बांधतात. या पोळ्यामधून मधकाढणी यंत्राच्या सहाय्याने मध काढून घेतल्यानंतर रिकामी झालेली पोळी पुन्हा भरण्यासाठी त्या दालनात परत ठेवली जातात. मधमाशांनी गोळा केलेले मध विकून चांगला नफा मिळतो. शिवाय पिकांमध्ये ३०–३५% उत्पादनवाढ होते कारण मधमाशा परपरागीभवन (cross-pollination) करतात. फुलोरा जितका चांगला, तितकी मधमाशांची वसाहत मजबूत होते. तांत्रिक प्रशिक्षण घेतल्यास मधमाशांना इजा न करता वैज्ञानिक पद्धतीने मध काढणी करता येते.

### मधुमक्षीकापालनासाठी योग्य जागा

- » मधुबन (मधपेट्या ठेवायची जागा) ऊन, वारा, पाऊस व धूर यापासून सुरक्षित असावी.
- » स्वच्छ, झाडांनी वेढलेले, सूर्यप्रकाश आणि फुलोरा असलेले ठिकाण निवडावे.
- » एका पेटीत ८–१० फ्रेम्स ठेवणे योग्य असते.
- » कीटकनाशक फवारणीपासून पेट्या दूर ठेवाव्यात.
- » ऋतुनुसार फुलोरा मिळेल अशा जागी पेट्या स्थलांतरित कराव्यात.
- » माकडं, अस्वलं, साप, मुंग्या, पक्षी यांच्यापासून संरक्षण करावे.



### व्यवसायाला सुरुवात

सुरुवातीला ५ ते १० पेट्या आणि मधुमक्षीकांच्या वसाहती, एक मधकाढनी यंत्र, एक धूर टाकण्याचं यंत्र आणि काही किरकोळ संचात आपण सुरुवात करू शकताय. महाराष्ट्रात मागणी असलेल्या सातेरी माशी किंवा मॅलिफेरा माशी मधमाशांच्या वसाहती जवळच्या जंगलातून किंवा त्यांच्या संगोपन केंद्रातून मिळू शकतात. तसंच महाराष्ट्रातील किंवा आजूबाजूच्या राज्यातील मधपालकाकडे सुद्धा या दोन्ही प्रकारच्या पेटी सहित वसाहती मिळू शकतात.

### वसाहतींची काळजी

मधाच्या हंगामात आठवड्यातून एकदा सकाळी तपासणी करावी. पोळ्यांतील अळ्या, जाळ्या काढून पेटी स्वच्छ ठेवावी. चौकटी आणि तळाचा भाग पोटॅशियम परमॅग्नेटमध्ये भिजवलेल्या कापसाने स्वच्छ करावा. पावसाळ्यात किंवा फुलोरा कमी असताना, भारतीय सातेरी मधमाशांना प्रति वसाहत २०० ग्रॅम साखर पाक आठवड्यातून एकदा द्यावा. मेलिफेरा वसाहतीसाठी गरजेनुसार साखर पाक द्यावा. जेव्हा फुलं कमी असतात (उन्हाळा, पावसाळा आदी.) तेव्हा मधमाशांना साखरेचा पाक (१:१ प्रमाणात) दिला जातो आणि गरज असल्यास वसाहती दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित केल्या जातात.

### प्रशिक्षण केंद्रे



राज्यात मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण केंद्र आहे. त्या ठिकाणी मधपालन, उत्पादन व विक्रीसंबंधी मार्गदर्शन दिले जाते. यामध्ये सेंट्रल बी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, पुणे आणि खादी ग्रामोद्योग मंडळ, महाबळेश्वर या दोन जागांचा समावेश होतो.

# सेंद्रिय खत निर्मितीच्या पद्धती

**जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी आणि पिकांच्या उत्तम वाढीसाठी सेंद्रिय खतांची आवश्यकता असते. पूर्वी शेतकऱ्यांकडे गायी, बैल असा मोठा बारदाना असे. त्यामुळे घरचेच शेणखत व त्याच्या जोडीला पिकांचे अवशेष या दोन्ही बाबी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असत. मात्र अलीकडे शेतीचे क्षेत्र कमी होत असताना जनावरे सांभाळणे, हे तुलनेने अवघड होत आहे. या स्थितीमध्ये सेंद्रिय खतांची उपलब्धता होत नसल्याने शेतकरी रासायनिक खतांवर अधिक अवलंबून राहू लागले आहे. ही बाब जमिनीच्या सुपीकतेसाठी आणि त्याच वेळी पिकाच्या पोषकतेसाठी चांगली नाही. अशा स्थितीमध्ये शेतामध्ये उपलब्ध पिकांचे अवशेष, वाया जाणारे सेंद्रिय पदार्थ यांच्या साह्याने सेंद्रिय खतांच्या निर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सेंद्रिय खत निर्मितीच्या काही पद्धतीची माहिती घेऊ...**



### कंपोस्टिंग म्हणजे काय?

पिकांचे अवशेष उष्ण आणि आर्द्र परिस्थितीत ठेवून, त्यातील जिवाणूंच्या वाढीला चालना देण्याची प्रक्रिया म्हणजे कंपोस्टिंग. हे सेंद्रिय पदार्थ हवेच्या सान्निध्यात (एरोबिक) किंवा हवारहित स्थितीमध्ये (अएरोबिक) ठेवणे या नुसार कंपोस्टिंगचे दोन प्रकार पडतात. या दोन्ही स्थितींमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे जिवाणू कार्यान्वित होऊन सेंद्रिय पदार्थांच्या विघटनाचे काम वेगाने करतात. त्यामुळे कमी कालावधीमध्ये खतांची उपलब्धता होऊ शकते.

### कंपोस्ट खतांचे महत्त्व

कंपोस्ट खते ही कोणत्याही दुर्गंधीशिवाय, हानिकारक सूक्ष्मजीवांपासून मुक्त असतात. कंपोस्टिंगच्या प्रक्रियेमध्ये सेंद्रिय पदार्थांचे वजन ८० ते ९० टक्क्यांपर्यंत कमी होते. या खतांमुळे चिकणमातीचा निचरा सुधारतो, तर वालुकामय मातीची जलधारणा सुधारते. पिकांच्या मुळाशेजारी उपकारक जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते. परिणामी, पिकांची वाढ आणि रोग प्रतिकारशक्ती वाढते.

### कंपोस्टिंगसाठी आवश्यक साहित्य

- » शेतातील पिकांचे अवशेष, तणे, गवते, चाऱ्याचा कचरा इ. (१४०० ते १५०० किलो. )
- » शेण ९० ते १०० किलो (८-१० टोपल्या).
- » शेतातील वरील मातीच्या सुपीक थरातील, वडाच्या झाडाखालील किंवा मुक्तसंचार गोठ्यातील कोरडी चाळलेली माती १७५० किलो (१२० टोपल्या).
- » पाणी : ऋतूनुसार १५०० ते २००० लिटर.

### कंपोस्टिंगच्या पद्धती

- » नाडेप पद्धत : ही हवेच्या सान्निध्यातील (एरोबिक) कंपोस्टिंग पद्धत आहे. यात वातावरणानुसार ९० ते १२० दिवसांत पूर्ण कुजलेले सेंद्रिय खत उपलब्ध होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रणालीमध्ये जमिनीच्या वरील थरातील सुपीक मातीचा वापर केला जात असल्यामुळे मातीतील उपयुक्त सूक्ष्मजीवही कुजण्याच्या प्रक्रियेत भाग घेतात. त्यामुळे या पद्धतीमध्ये शेणाचे प्रमाण थोडे कमी असले तरी चालू शकते. आज शेणाची उपलब्धता कमी झाली असताना ही पद्धत उपयोगी ठरू शकते.
- » खड्ड्यात कंपोस्ट बनविणे : ही पद्धत जिथे पावसाचे प्रमाण कमी आहे, अशा ठिकाणी वापरता येते. तरीही खड्ड्यासाठी जागा निवडताना थोडी उंचावरील म्हणजेच पावसाचे पाणी शिरणार नाही अशी असावी. जागा गोठ्याजवळ आणि पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतांजवळ असावी. शक्यतो रस्त्याच्या कडेला नसावी. कारण वाहनाच्या धूरातून येणारे प्रदूषक घटक (शिसे व अन्य) त्यात शिरण्याचा धोका असतो.
- » टाक्या बांधणे : एकाआड एक या पद्धतीने ९ इंच जाडीच्या विटांची रचना करत भिंतीनी मातीच्या पृष्ठभागावर टाकी बांधली जाते. टाकीच्या भिंतीच्या चारही बाजूंना ६ ते ७ इंच छिद्रे सोडली गेल्यामुळे हवेचे अभिसरण चांगल्या प्रकारे होते. ही टाकी गुरांच्या गोठ्याजवळ, शेताजवळ असाव्यात. टाकीचा आकार १० फूट × ६ फूट × ३ फूट असावा. जर प्लॅस्टरिंग करणार असाल, तर शेण व मातीच्या मिश्रणाने करावे.
- » प्लॅस्टिक कागदाची टाकी : सध्या बाजारामध्ये जाड अशा प्लॅस्टिक, ताडपत्री व अन्य घटकांपासून बनविलेल्या टाक्या उपलब्ध होत आहेत. या टाक्यांचा वापर कंपोस्टिंग करता येते. मात्र त्यांचा वापर प्राधान्याने गांडूळ खत निर्मितीसाठी केला जातो.

### टाकी भरण्याची पद्धत

- » टाकी भरण्यापूर्वी शेणाची स्लरी जमिनीवर आणि भिंतीवर शिंपडावी.
- » पहिला थर : शेतात उपलब्ध वनस्पतींचे अवशेषांचा ६ इंच जाडीचा थर द्यावा. (१०० ते ११० किलो)
- » दुसरा थर : पहिल्या थरावर शेण किंवा गोबरगॅस-स्लरी (१२५ ते १५० लिटर पाण्यात ४ ते ५ किलो शेण) शिंपडावी.
- » तिसरा थर : त्यावर स्वच्छ कोरडी चाळलेली माती (दगड, खडे, काच, प्लास्टिक इ. नसावे) ५० ते ६० किलो (४ ते ५ टोपल्या) पसरून हलके पाणी शिंपडावे. या क्रमाने पुन्हा एकावर एक असे थर भरून टाकीच्या भिंतीच्या वर एक ते दीड फूट येईपर्यंत भरावी. टाकी क्षमतेनुसार अकरा ते बारा थर आवश्यक आहेत. वरच्या बाजूला झोपडीसारखा त्रिकोणी आकार देऊन शेणमातीच्या थराने झाकून बंद करावी. हा थर ओलसर राहील असे पाहावे. जर सुकून भेगा पडल्यास पुन्हा एकदा चिखलाचा लेप द्यावा.

# सेंद्रिय खत निर्मितीची यांत्रिक पद्धती

नैसर्गिकरीत्या सेंद्रिय पदार्थ विघटनाचा (कंपोस्टिंग) एक ठराविक वेग असतो. या प्रक्रियेसाठी सामान्यतः ९० ते १२० दिवस लागतात. यात गांडुळासारख्या अधिक वेगाने विघटनाची प्रक्रिया घडविणाऱ्या सजीवाचा समावेश केल्यास हा वेग वाढतो. तरीही किमान ६० दिवस कंपोस्टिंगच्या प्रक्रियेसाठी लागतात. हा वेळ आणखी कमी करण्यासाठी यांत्रिक पद्धतीचा अवलंब केला जातो. या यंत्राला कंपोस्ट मशिन असे संबोधतात. एकच मोठे कंपोस्ट मशिन बसविण्याऐवजी विकेंद्रित स्वरूपात अनेक कंपोस्ट मशिन बसवणे फायदेशीर ठरू शकते.

### कंपोस्ट मशिन

पूर्णपणे स्वयंचलित, आकाराने छोटे, स्टेनलेस स्टीलची बनावटीचे हे यंत्र सर्व प्रकारच्या सेंद्रिय कचऱ्यावर प्रक्रिया करते. आवाजरहित, हानिकारक वायूच्या उत्सर्जन नसलेल्या प्रक्रियेतून गंधरहित, रोगकारक सूक्ष्मजीवापासून मुक्त असे सेंद्रिय खत उपलब्ध होते. हे यंत्र चालवण्यासाठी कुशल व्यक्तींची आवश्यकता नसते. अगदी घरगुती सेंद्रिय कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी लहान (४ किलो प्रति दिवस) ते शेतातील मोठ्या प्रमाणातील सेंद्रिय पदार्थांच्या विघटनांसाठी मोठ्या आकाराची (२ टन प्रति दिवस) यंत्रे बाजारात उपलब्ध आहेत. या सर्व यंत्रांमध्ये सेंद्रिय पदार्थांचे बारीक तुकडे करण्यासाठी श्रेडर वापरलेला असतो. हे बारीक घटक कंपोस्टरमध्ये जातात. तिथे आम्लधर्मी (३.५ ते ४.५ सामू) आणि उष्ण वातावरणामध्ये वाढणारे जिवाणू त्यात मिसळले जातात. प्रक्रियेच्या सुरवातीला सर्वसाधारण तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअस आणि आर्द्रता ७० ते ८०% असते. त्यात इलेक्ट्रिक हिटरच्या साह्याने वाढ केली जाते. या वाढीबरोबरच आर्द्रता कमी होत जाते, तेव्हा कंपोस्टिंग जिवाणू वेगाने आपले काम करतात. हा वेग आणखी वाढावा यासाठी सेंद्रिय पदार्थ २ आवर्तन प्रति मिनीट या सावकाश वेगाने घुसळले जातात. यातील खराब वास कमी करण्यासाठी बाहेर पडणारे वायू, आर्द्रता हे घटक बंदिस्त पाइपलाइनद्वारे ओल्या लाकडाच्या तुकडे असलेल्या चेंबरमध्ये सोडले जाते. हे घटक शोषले गेल्याने बाहेर दुर्गंध येत नाही. सामान्यतः २४ तासात कंपोस्ट खत तयार होते.



### कंपोस्टिंग मशिनचा उपयोग

ज्या ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सेंद्रिय टाकाऊ घटक उपलब्ध होतात, अशा कोणत्याही ठिकाणी वापरणे शक्य आहे. पिकांचे अवशेष उपलब्ध असलेल्या शेतांमध्ये वापरता येतील. त्याच प्रमाणे भाजीपाला आणि फळ बाजार, अन्न प्रक्रिया आणि उत्पादन सुविधा, हॉटेल्स, खानावळी, प्रसाद सेवा असलेली मंदिरे वा धार्मिक संस्था, समूह गृहनिर्माण संस्था इ. ठिकाणी ओल्या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी हे यंत्र उपयोगी ठरेल. अन्न आणि सेंद्रिय कचरा वेगाने कंपोस्ट झाल्यामुळे कचरा हाताळणी, वाहतूक कमी होईल. आज शेतातील टाकाऊ पदार्थ जाळणे, शहरी भागामध्ये कचऱ्याचे डोंगर यातून पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो. या कचऱ्यातील सेंद्रिय घटक वेगळे करण्याचा खर्च वाढला तरी त्यातून कचऱ्याचे वजन अत्यंत कमी होते. प्रत्येक १०० किलो सेंद्रिय कचऱ्यातून १० ते १५ किलो कंपोस्ट खताची उपलब्धता होते.

# सेंद्रिय खत

## व्यवस्थापनाचे तंत्र...



**वनस्पतींनी निर्माण केलेले अन्न प्राणी सूक्ष्मजीवांच्या मध्यस्थीशिवाय घेऊ शकत नाही, तर प्राण्यांनी वनस्पतीसाठी तयार केलेले अन्न वनस्पती सूक्ष्मजीवांच्या मध्यस्थीशिवाय घेऊ शकत नाही. सूक्ष्मजीवांची मध्यस्थी आजवर झाकून पडलेली आहे. यामुळे वनस्पतीचे अन्नपोषण नेमके कसे होते, याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.**

सेंद्रिय खत व्यवस्थापन हा शेतीतील कळीचा मुद्दा आहे. त्याअभावी शेती ठप्प होऊ शकते. आज सर्वत्र उत्पादकता कमी होण्यामागे जमिनीत कमीतकमी होणारे सेंद्रिय खताची टक्केवारी हे आहे. सूक्ष्मजीवशास्त्राच्या अभ्यासाने हे लक्षात आले. पृथ्वीवर दोन सजीवांचे मुख्य गट आहेत. यामध्ये वनस्पती आणि प्राणी यांचा समावेश होतो. आज आपल्याला शिकविले जाते अन्नद्रव्यांबाबत वनस्पती स्वयंपूर्ण आहेत. प्राणी गट पूर्णपणे वनस्पतीवर अवलंबून आहे. अभ्यासातून हे लक्षात आले की, हे विधान चुकीच्या गृहतिकावर आधारित आहे. याबाबत अन्नचक्राचा अभ्यास करावा. वनस्पती सूर्यप्रकाशात स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात. प्राण्यांना ते शक्य नाही. इथे थोडा खोलवर जाऊन अभ्यास केल्यास वनस्पती प्राणीवर्गासाठी अन्ननिर्मिती करतात, तर प्राणी वनस्पतीसाठी अन्ननिर्मिती करतात. वनस्पतींनी निर्माण केलेले अन्न प्राणी सूक्ष्मजीवांच्या मध्यस्थीशिवाय घेऊ शकत नाही, तर प्राण्यांनी वनस्पतीसाठी तयार केलेले अन्न वनस्पती सूक्ष्मजीवांच्या मध्यस्थीशिवाय घेऊ शकत नाही. सूक्ष्मजीवांची मध्यस्थी आजवर झाकून पडलेली आहे. यामुळे वनस्पतीचे अन्नपोषण नेमके कसे होते हा भागच शेतकऱ्यांना शिकविला जात नाही. यातील सूक्ष्मजीवांच्या योग्य मध्यस्थीच्या अज्ञानामुळे शेती धोक्याच्या पातळीकडे जात आहे.

### जमिनीतील सेंद्रिय घटक महत्त्वाचे...

आपण जे सेंद्रिय खत जमिनीला देतो ते केवळ या सूक्ष्मजीवासाठीच असते. त्याची कमतरता असेल तर तुम्ही टाकलेली अन्नद्रव्ये पिकापर्यंत पोहोचू शकत नाहीत. अनेक कारणामुळे गरजेइतके सेंद्रिय खत आपण देऊ शकत नाही आणि भावी काळात पुरेसे देऊ शकणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेतली तर तो काहीतरी करून शिफारशीइतके रासायनिक खताचे हप्ते देईल. परंतु सेंद्रिय खत वापरात कमी अगर न वापराची तडजोड करेल. त्याऐवजी रासायनिक खताचे जास्त हप्ते देऊ असे ठरवेल, हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. कृषी विद्यापीठाची २० ते २५ गाड्या चांगले कुजलेले खत जमिनीत मिसळण्याची शिफारस आहे. या शिफारशीचा वापर शेतकरी कधीच करू शकणार नाही, हे वास्तव विद्यापीठात केव्हा पोहोचणार ? या जुन्या मार्गाने शक्य नसेल तर पर्यायी मार्ग सुचविणे गरजेचे आहे. पर्यायी मार्गात हिरवळीचे खत, पेंडी, लेंडी, साखर कारखान्याकडून मिळणारे मळी खत असे काही पर्याय सुचविले जातात. या सर्व मार्गांचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्याकडे खरेदी, वाहतूक, भरणी उतरणी, रानात पसरणे आणि मिसळणे अशा सर्व कामासाठी मोठ्या प्रमाणावर वित्त बळ लागते ते बहुतेक शेतकऱ्याकडे नसते. या कामासाठी मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर लागते, त्याची टंचाई लक्षात घ्यावीच लागेल. शेतकऱ्यांच्या क्रयशक्तीबाबत काही उदाहरणे आपणापुढे मुद्दाम ठेवाविशी वाटतात. आमचे कोल्हापुरात प्रामुख्याने ऊस शेती केली जाते. त्याचप्रमाणे पशुपालन दुधासाठी मोठ्या प्रमाणावर आहे. आमच्यापासून तासगाव १२५ ते १५० किमी अंतरावर आहे. आमच्या भागात तयार होणारे बहुतांशी शेणखत ट्रकद्वारे तेथील द्राक्ष शेतीमध्ये पोहोचविले जाते. ते जसे पैसे देतात त्या प्रमाणात ऊसवाला देऊ शकत नाही. बरेच दिवस मला वाटे की भूमिहीन लोकच फक्त असे खत विकून टाकत असावेत. खोलात शिरून अभ्यास करता स्वतःची जमीन आणि पीक असणारा शेतकरीही खत विकून टाकतो असा शोध लागला. ऊसवाल्याचे पैसे मे- जून पर्यंत संपून गेलेले असतात. खरीप पिकाचे व्यवस्थापन आणि त्याच काळात असणारे बहुतेक मोठे सण यातून पार पडण्यासाठी बुडत्याला काडीचा आधार याप्रमाणे खत विकून घराची गरज भागविली जाते.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी ऐकून घेतल्या नागरिकांच्या तक्रारी; परभणीत 'जनसंवाद' उपक्रम



**परभणी(प्रतिनिधी)** –पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी २१ सप्टेंबर रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी येथे जिल्ह्यातील तक्रारदारांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे जलद निवारण करणे, पोलीस व नागरिकांमधील संवाद मजबूत करणे आणि लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस–जनता संबंध अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

परभणी जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. यादरम्यान, दुपारी ३:०० ते ५:०० या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'जनसंवाद' साधला. या प्रसंगी एकूण १६ तक्रारदारांनी आपले लेखी अर्ज सादर केले. यामध्ये मालमत्ताविषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, फसवणूक, कौटुंबिक वाद आणि अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश होता. प्राप्त सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेत त्यांच्या जलद निवारणासाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या जलद निवारणासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील 'फीडबॅक टीम'मार्फत घेतला जाणार आहे. या वेळी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## वाराणसीत पोलिसांसोबत चकमक; नक्षलवादी कमांडर ठार

**वाराणसी (प्रतिनिधी)**– वाराणसीमध्ये उत्तर प्रदेश पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत झारखंडमधील बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेचा एक कमांडर ठार झाला आहे. रविवारी पहाटे रामनगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. ब्रिजेश गंजू उर्फ गोपाल सिंग भोक्ता असे ठार झालेल्या कमांडरचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गंजू हा मोटार-सायकलवरून आपल्या एका साथीदारासोबत तेगारा क्रॉसिंगहून रामनगरमार्गे मुघलसरायच्या दिशेने जात होता. यावेळी पोलिसांच्या पथकाने त्याला अडवून अटक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, गंजूने पोलिसांवर गोळीबार केल्याचा दावा पोलिसांनी केला. त्यानंतर पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात गंजू गंभीर जखमी झाला.

## महेश अर्बन को–ऑप. बँक लि. अहमदपूर
## जाहीर लिलावाची नोटीस

(म. स. का. १९६० मधील कलम १५६ व नियम १०७ (५) अन्वये)

तमाम जनतेस कळविण्यात येते कि आमच्या महेश अर्बन को. ऑप. बँक लि. अहमदपुर शाखा नांदेड द्वारे सूचित करण्यात येते कि बँकेच्या थकबाकीदार सभासद हरजींदरसिंघ गुरमितसिंघ सुखई यांचे वाहन क्रमांक चक२६ उझ ५९८८ ह्या क्धणछऊख कपिनीचे ४ व्हीलर वाहन थकबाकी वसुली कारवाई पोटी जम केले आहे, कायद्यातील तरतुदिप्रमाणे सदरील वाहन लिलावाद्वारे विक्री करावयाचे असून सदरील वाहन जश्या आहे तश्या स्थितीत जाहीर लिलावा द्वारे विक्री करावयाचे आहे.

तरी इच्छुक व्यक्तीनि लिलावात भाग घेऊन सहकार्य करावे.

लिलावाची दिनांक २८.०९.२०२६

लिलावाचे स्थळ: महेश अर्बन को–ऑप. बँक लि. अहमदपूर मुख्य कार्यालय, कॉलेज रोड, बसवेश्वर चौक, अहमदपूर

**वाहनाची संपूर्ण माहिती**

वाहन मॉडल– HYUNDI EXTER 1.2MT KPP SX DUL CNG

इंजिन क्रमांक– G4LSM255226

चेसिस क्रमांक–MALB381CLSM152861

गाडी क्रमांक– MH 26 CP 5988

गाडी पाहण्याकरिता मुख्य कार्यालय, कॉलेज रोड, बसवेश्वर चौक, अहमदपुर येथे बँकेच्या वेळेत संपर्क करावा.

हे जाहीर लिलाव प्रसिद्धिकरण केले.

दिनांक २१.०९.२०२६

टीप: लिलावाच्या अटि व शर्ती लिलाबा दिवशी जाहीर केल्या जातील.

स्वाक्षरीत/–
विशेष वसुली व विक्री अधिकारी
महेश अर्बन को–ऑप. बँक लि. अहमदपूर
संपर्क–९१३००७७४२५, ९१३००७७४२४

# संचालक धनंजय औंढेकरांकडून शहरात नवीन वीज उपकेंद्राच्या जागेची पाहणी

**नांदेड/ परभणी (प्रतिनिधी)**– परभणी शहर आणि परिसरातील ग्राहकांची विजेची वाढती गरज लक्षात घेवून आणि शहर वाशीयांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करता यावा, यासाठी शहरात वाढीव वीज उपकेंद्राच्या जागेचा महावितरणचे संचालक(संचलन) धनंजय औंढेकर यांनी सोमवार दि. २१ सप्टेंबर आढावा घेवून सोयीच्या जागेची पाहणी केली.

मुख्य अभियंता राजाराम माने आणि परभणीचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली यांनी संचालकाना परभणी शहरातील वाढती ग्राहक संख्या, सध्या अस्तित्वात असलेल्या वीज यंत्रणेवरील मर्यादांची माहिती दिली. शहराची गरज आणि ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करता येईल अशा दृष्टीने जिंतूर रोडवरील जूने पॉवर हाऊस ते वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या केंद्रभागी असलेल्या जिंतूर रोडवरील एका जागेची त्यांनी पाहणी केली. शिवाय, ती जागा तत्काळ संपादित करण्यासाठी परभणी महानगर पालीकेकडे पाठपुरावा करण्याच्या सुचनाही श्री. औंढेकर यांनी मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंत्याना दिल्या. जिंतूर रोड भागातील होणाऱ्या या नवीन उपकेंद्राचे काम लवकरच सुरु होणार असल्याने शहरातील लाखों वीज ग्राहकांची समस्या कायमची संपणार आहे.

या भागात असलेल्या जून्या उपकेंद्रातील १० एमव्हिएचा पॉवर ट्रान्स्फॉर्मर ७ सप्टेंबर रोजी निकामी झाला होता. त्यामुळे परभणी शहरातील दर्गा रोड, जाम नाका, जिंतूर रोड, टिचर कॉलनीसह शहरातील अनेक भागांचा सात ते आठ तास वीज पुरवठा खंडित झाला होता. शिवाय, त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. संचालकांनी त्या तक्रारींची दखल घेवून शहरात नवीन एका उपकेंद्राच्या उभारणीसाठी जागेची पाहणी केली. या प्रस्तावित उपकेंद्रामुळे परभणीकरांना दिलासा मिळणार आहे.

परभणी आणि हिंगोली जिल्ह्यासाठी असलेल्या परभणीस्थित मुख्य भांडार गृहासही संचालक धनंजय औढेंकर यांनी भेट देवून पाहणी केली. तेथे पडून असलेल्या साधन सामग्रीचा परभणी व हिंगोली जिल्ह्यात आवश्यक तिथे वापर करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. त्यावेळी त्यांच्यासोबत मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंता मंदार वग्यानी, प्रवीण चाकोले यांच्यासह इतर उपकार्यकारी, सहायक अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विक्री करारनामा (करार पत्र)

मी लिहून घेणार चंद्रकला मारोती तिडके, वय–२९ वर्षे, धदा–गृहिणी, रा.देगांव (बु.) ता.अर्धापूर जि.नांदेड,लिहून देणार अंबादास कोंडीबा मुदखेडे, वय–४८ वर्षे, धंदा–व्यापार, रा.अर्धापूर ता.अर्धापूर जि. नांदेड मी विक्री करारनामा (सौदाचिठ्ठी आधारे सौदाचिठ्ठी) लिहून देतो की, मौजे अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथील गट क्र.५१० मधील नगर पंचायत हद्दीतील माझे जाती मालकी व ताब्यातील अकृषिक झालेले खुले प्लॉट ज्याचा क्र.१८ आहे. ज्याची एकुण रूंदी उत्तर–दक्षिण ९.०० मीटर व लांबी पुर्व–पश्चिम १३.०० मीटर असून ज्याचे एकुण क्षेत्र. १२५९ चौ. फुट म्हणजे ११७.०० चौ.मी. आहे. जे मी मुळ मालक शेख खय्युम पि.शेख पाशामियाँ यांचेकडून सौदाचिठ्ठी आधारे खरेदी केले आहे. जे तुम्हांस सौदाचिठ्ठी आधारे सौदाचिठ्ठी नुसार विक्री करण्याचा करार केला आहे. ज्याची चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे.

उत्तरेस प्लॉट क्र. १९. दक्षिणेस प्लॉट क्र. १७.

पुर्वेस ९.०० मीटर रुंद रस्ता. पश्चिमेस :– प्लॉट क्र.४१

याप्रमाणे चतुःसीमेच्या आतील सदर खुले प्लॉट आंतरीक व बाहय हक्कासह ज्याची किंमत ठरलेली आहे. त्यापैकी काही रक्कम म्हणून बयाना मला मिळाला आहे उर्वरित पैसे रजिस्ट्रीवर देण्याचे ठरले आहे. या विक्री व करारावर कोणाला काही आक्षेप असल्यास सात दिवसाच्या आत कागदपत्रासहीत दाखवावा हे जाहीर प्रकटना व्दारे कळवित असुन संपर्क साधावा अन्यथा माझा करार ग्राह्य धरून ठरल्याप्रमाणे नावावर करून घेणार आहे. तुम्हांस कायमचे विक्री करण्याचा करार केला आहे. सदर ठरलेल्या एकूण किंमतीपैकी मला खरेदीदार यांचेकडून आज दि. ०८/०९/२०२६ रोजी बयाना म्हणून काही रक्कम मिळाली आहे. उर्वरित पैसे १ महिना म्हणजेच दि. ०८/१०/२०२६ रोजी पर्यंत रजिस्ट्रीवर देण्याचे ठरले आहे. उर्वरीत रक्कम मिळाल्यांनतर सदर प्लॉटचा रजिस्ट्री (बयनामा) खरेदीदार यांच्या नांवे अथवा ते सांगतील त्या व्यक्तीच्या नांवे खरेदीदार हे स्वखर्चाने करून घेतील. त्याबाबत मला कोणत्याही प्रकारची अडचण राहिलेली नाही.हे की, रजिस्ट्रीला लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची व कायदेशीर बाबींची पुर्तता करून देण्याची तथा सदरहू प्लॉटवर न.पं. अर्धापूर व इतर कार्यालयाची काही बाकी असल्यास ते रजिस्ट्रीच्या वेळेस निल करून देण्याची, प्लॉटची आवश्यक ती सर्व सर्व कागदपत्रे काढून देण्याची व मुळ मालकास आणून रजिस्ट्री करून देण्याची जबाबदारी विक्री करणार यांची राहील.

**जाहीर प्रगटन देणारे**
**चंद्रकला मारोती तिडके,**
**रा. देगांव (बु.) ता.अर्धापूर जि. नांदेड**

## Change In Name

My old name is **Mohammed Sohel Mohammed Haroon** Which now I am changing as New name **Mohammed Sohel** hence forth my all. Correspondence will be done as per my new name please consider the same.

**Address:** Laxmi Nagar, Gali No. 16 Degloor naka, nanded.
Mo. No. 9623529801

## Change In Name

My (Old Name) Is **Shobhabai Laxman Chuare** Which Now I Am, Changing As (New Name) **Shobha Laxman Chaure** Hence, Forth My All Correspondance Will Be Done As Per My New Name. Please Consider The Same.**Sign By-**Shobha Laxman Chaure House No.14, Gajanan Maharaj Mandir, Malegaon Road, Taroda Khu, Nanded-431605 Moblie No. 9011000976

## Change In Name

We, Pathan Jamal (Father) and Shahla Anjum (Mother), parents of our minor daughter Ayeza Fatema, hereby declare that we have changed the name of our daughter from Ayeza Fatema to Amira Fatema Pathan Jamal

Address:S.35 P NO.05,BARKATPURA WAGHI ROAD,NANDED,431601
MAHARASHTRA, INDIA,
MOBILE No. : 8788443776

## Change In Name

My Old Name Is **BAGWAN ABDUL QAYYUM** Which Now I Am, Changing As New Name **ABDUL QAYYUM MOHIYODDIN BAGWAN** Hence, Forth My All Correspondance Will Be Done As Per My New Name. Please Consider The Same.**Address-**9-7-449, Imran Collony Near Khaled Bin Walid Masjid Itwara Nanded-431604 Moblie No. 9011000976

## जाहीर प्रगटन

प्रति,
कमलबाई कोंडबा मस्के
व इतर ०४ रा. पाळज ता. भोकर, जि.नांदेड (मार्फत – तहसीलदार, भोकर)

विषय – मौ. पाळज ता. भोकर गट क्रं. ११६ मधील ०१ हे. २७ आर. जमीन वर्ग–२ असून वर्ग–१ करणे बाबत. अर्जदार कमलबाई कोंडबा मस्के व इतर ०४ रा. पाळज ता. भोकर, जि.नांदेड

संदर्भ:– १. तहसीलदार, भोकर यांचा अहवाल दि. १४/०७/२०२६

२. महाराष्ट्र राजपत्र महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे राजपत्र अधिसुचना क्रमांकः मरोम–२०२०/प्र.क्रं.५०/ल–७ दिनांक ०४/०५/२०२६

३. या कार्यालयाचे अहवाल सादर करणेबाबत पत्र दिनांक ०२/०७/२०२६

उपरोक्त विषयी आपण तहसीलदार, भोकर यांच्या मार्फत अर्ज सादर करुन मौ. पाळज ता.भोकर गट क्रं.११६ मधील ०१ हे.२७ आर महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम–२०२६ अन्वये सिलींग जमीन भोगवटादार वर्ग २ मधून १ मध्ये रुपांतरित करणेबाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने दोन जास्त खपाच्या (एक स्थानिक व एक राज्यस्तरीय) वृत्तमानपत्रात जाहीर प्रगटन देऊन सदरील जमीनेचे वर्ग २ चे वर्ग १ करणेसाठी करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात मागविणे आवश्यक आहे.

सबब, सोबतच्या प्रपत्र–३ मध्ये दोन स्थानिक वृत्तमानपत्रात जाहीर प्रगटन देऊन कात्रणे या कार्यालयास सादर करावीत.

**(अजय शिंदे)**
**उपजिल्हाधिकारी (महसूल),**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**

## महाराष्ट्र शासन

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर**
**कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर.**
**पत्ताः भक्तापुर रोड, देगलुर जि. नांदेड– ४३१७१७**
ई– मेल:- eclpddegr@gmail.com

### ई–निविदा सूचना क्र. ०१ सन २०२६–२७

महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई– निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| |
|---|
| १. कामाचे नाव :– लेंडी प्रधान प्रकल्प ता. मुखेड जि.नांदेड अंतर्गत लेंडी प्रधान प्रकल्पाच्या सांडव्याचे तसेच उजव्या बाजुच्या मार्गदर्शक भिंतीचे उर्वरीत संधानक व उपांगभुत काम व सा. क्र. ११०० मी ते १२६० मी या मधील तलांक ३८८ मी च्या खालील वाढीव रुंदीतील मातीकाम व शैलपदाग्रहाचे काम करणे. |
| २. कामाचा जिल्हा : नांदेड (महाराष्ट्र राज्य) |
| ३. निविदेची किंमत : रु.१४३३.२५ लक्ष (वस्तु व सेवा कर वगळून) |
| ४. ई निविदा उपलब्ध कालावधी : दि. २१/०९/२०२६ ते दि. ०५/१०/२०२६ |
| ५. ई निविदा उघडण्याचा दिनांक : दि. ०७/१०/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ६. इसारा/बयाना रक्कम : रु. ७.१७ लक्ष |
| ७. काम पूर्ण करण्याचा कालावधी : ०६ महिने |
| ८. ई निविदा संचाची किंमत : रु.५,९००/– (वस्तु व सेवा कर सह ) |
| ९. कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग : निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

ई निविदा बाबत सर्व माहिती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

i) शासनाचे संकेतस्थळ- https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

ii) कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांचे कार्यालयातील नोटीस बोर्ड.

जा.क्र. लेप्रविदे/लेखा–१/ १७०१
कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांचं कार्यालय

दिनांक: ११/०९/२०२६

**कार्यकारी अभियंता,**
**लेंडी प्रकल्पविभाग,**
**देगलूर**

## मार्कमेमो हरवला

माझी तृप्ती विजयानंद खिल्लारे या नावाची इयत्ता १२ वी विज्ञान पासचा मार्कमेमो नांदेड ते परभणी बस प्रवासात हरवला आहे. ज्यांना कोणाला सापडला असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**– तृप्ती विजयानंद खिल्लारे, रा. नांदेड

## Change In Name

My Old Name Is **KHAN SOFIYA ANAM ASAD.** Now I Am Changing As New Name is **SOFIYA ANAM MOHAMMED MOIZUDDIN**.Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

**Address-** Peerburhan, street no. 10, Nanded. NANDED 431605 (M.S)




No. 1333/26-27 Date-21/9/2026

## TENDER NOTICE

**Sealed quotations are invited from approved cement stockiests/ dealers for supplying 640 bags (32.00 Ton) of fresh ordinary Portland Cement Grade 53, confirming to latest code and manufactured by reputed and established Cement Factory ( MP Birla, JSW, Ultatek, Ambuja, Orient, ACC Birla )**

**Rate when quoted shall include all taxes, and cost of transport up to Gurudwara premises, cost of loading unloading shall be quoted separately.**

**Quotation duly completed signed and sealed should be submitted in Gurudwara Sahib office on up to Dt 26-09-2026 during office working hours 11.30am. Right of rejecting any or all Quotations is therto reserved with the Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded.**

**Superintendent,**
**Gurudwara Sachkhand Board,**
**Nanded.**

सुनावणीची तारीख ०५ ऑक्टोंबर २०२६

## मुंबई येथील न्यायाधिकारी हायकोर्टात खंडपीठ औरंगाबाद

**दिवाणी अर्ज नंबर ८९४० सन २०१९**
**मध्ये**
**दुसरे अपील स्टॅम्प नंबर ६७९९ सन २०१९**

तदर्थ जिल्हा न्यायाधीश –१,
कंधार कोर्टाचा रे. दि. अपील नं. ४० सन २०१०
शीला पिता संभा देवकाते (Deokate) व दुसरा ....अर्जदार
ॲडव्होकेट कुलकर्णी एम. ए.

विरूद्ध

संभा पिता बापुराव देवकाते व इतर ....सामनेवाले
प्रति,
सा. नं. ४ : संभाजी पिता हुलाजी (Hulaji) हाबगुंडे (Habgunde)
वय : संज्ञान वर्षे, धंदा : शेती,
वरील रा. रिसनगांव, ता. लोहा, जि. नांदेड
.... सामनेवाले

दावा रूपये

सदरहू सामनेवाले नं. ४, वरीलप्रमाणे, राहणार वरीलप्रमाणे मजकूर यास अर्जदारांनी या कोर्टात दाखल केलेल्या दिवाणी अर्जाचे नकलेत नमूद केल्याप्रमाणे असा अर्ज केला आहे की, सदरहु दुसरे अपील दाखल करण्याकरिता जो १२६ दिवसांचा विलंब झाला आहे तो माफ करण्यात यावा वगैरे...वगैरे...

सदरहू अर्ज तारीख २४ माहे ऑगस्ट, सन २०२६ रोजी कोर्टात निघून हुकूम झाला त्याप्रमाणे तुम्हास नोटीस देण्यात येते की, हा अर्ज या कोर्टात तारीख ०५ माहे ऑक्टोंबर, सन २०२६ रोजी हुकूमाकरीता रुजू होईल ते समयी तुम्ही स्वतः किंवा या कोर्टाचे वकिलामार्फत या कोर्टात हजर होऊन अर्जदाराचे अर्जाप्रमाणे हुकूम का करु नये या विषयीचे कारण दाखवावे, सदरहूप्रमाणे हजर होऊन कारण न दाखवल्यास अर्जदाराचे किंवा कोर्टास योग्य वाटेल तो हुकूम केला जाईल. यास साक्ष नामदार माननीय श्री रविंद्र व्ही. घुगे सदरहू मुंबई येथील प्रभारी मुख्य न्यायाधिकारी.

तारिख २४ माहे ऑगस्ट, सन २०२६.

क्लार्क
के. व्ही. थोरात

कक्ष अधिकारी
सौ. सविता आर. कुलकर्णी

कोर्टाचे हुकूमाने
फॉर डेप्युटी रजिस्ट्रार
सौ. एस. यू. अंबेकर



## रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# मुखेड तालुका खरेदी-विक्री संघाची निवडणूक २३ सप्टेंबरला

## सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान; मतदानानंतर लगेच मतमोजणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ मर्या., मुखेडच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवडणूक बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी होत आहे. या निवडणुकीसाठी मुखेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ नवा मोंढा, मुखेड येथील कार्यालय हे मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे.

मतदानाची वेळ सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत राहणार आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे.

या निवडणुकीत विविध प्रवर्गातील एकूण ७ जागांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये वैयक्तिक मतदारसंघातील २, महिला प्रतिनिधींसाठी २, अनुसूचित जाती-जमातीसाठी १, इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी १ तसेच विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गासाठी एका जागेचा समावेश आहे.

वैयक्तिक मतदारसंघात एकूण १४६ मतदार, तर संबंधित सहकारी संस्था मतदारसंघात ९५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली असून, निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी अनिल चव्हाण यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. मतदान केंद्र तसेच मतमोजणीचे ठिकाण म्हणून मुखेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे नवा मोंढा, मुखेड येथील कार्यालय निश्चित करण्यात आले आहे.

# डम्पिंग ग्राउंडचा कचरा खदानीत अन् रस्त्याच्या कामावर? पोलीस कारवाईनंतर महापालिका प्रशासनाची धावपळ

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील कचऱ्याच्या प्रश्नावरून महापालिका प्रशासनासमोर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. डम्पिंग ग्राउंडवर साठवला जाणारा दुर्गंधीयुक्त कचरा डेरला येथील खदानीत तसेच रस्त्याच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या ठिकाणी टाकला जात असल्याची बाब पोलीस कारवाईत समोर आल्यानंतर महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे. मात्र हा कचरा इतरत्र नेऊन टाकण्यास परवानगी कोणी दिली, याची चर्चा आता महापालिका वर्तुळात सुरू झाली आहे.


तुप्पा डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून यंत्रसामग्री उभारण्यात आली आहे. हा प्रकल्प ठेकेदारामार्फत चालविण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खतनिर्मिती केली जाते, असा दावा महापालिकेकडून वेळोवेळी करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात प्रकल्प किती वेळ कार्यरत होता आणि दररोज किती कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती, याची वस्तुनिष्ठ माहिती आता तपासण्याची गरज निर्माण झाली आहे.

डम्पिंग ग्राउंडवर वर्षानुवर्षे कचऱ्याचे मोठमोठे ढीग दिसत असताना दुसरीकडे कचरा प्रक्रियेचा प्रकल्प कार्यान्वित असल्याचे सांगितले जात होते. त्यामुळे प्रक्रियेचे काम प्रत्यक्षात सुरू होते की केवळ कागदोपत्री दाखवले जात होते? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे कचऱ्याची वाहतूक आणि विल्हेवाटीची पद्धत चर्चेत आली आहे. डम्पिंग ग्राउंडवरील कचरा डेरला येथील खदानीत नेण्याची किंवा रस्त्याच्या कामासाठी वापरण्याची अधिकृत परवानगी होती का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. कचऱ्याच्या वाहतुकीवर कोणत्या अधिकाऱ्याचे नियंत्रण होते, वाहने कुठे जात होती, त्याची नोंद ठेवली जात होती का, याचाही तपास होणे गरजेचे आहे.

कचरा व्यवस्थापनासाठी मोठा खर्च होत असताना त्याची योग्य विल्हेवाट न लागता तो शहराबाहेर किंवा अन्य ठिकाणी टाकला जात असेल तर नागरिकांच्या आरोग्याचा आणि पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनतो. त्यामुळे महापालिका आयुक्त या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करणार का, दोषी आढळणाऱ्या अधिकारी अथवा संबंधितांवर कारवाई करणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## गणेश दर्शन



श्री लिंगायत बाल गणेश मंडळ गवळी गल्ली, नांदेड



रामघाटचा राजा रामघाट, नांदेड



मनपा अधिकारी कर्मचारी गणेश मंडळ, नांदेड



मोरया गणेश मंडळ, शास्त्रीनगर, नांदेड



श्री एकता गणेश मंडळ, तरोडा, नांदेड (छाया : करणसिंह बैस)



**नांदेड** –शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या विविध मागण्या घेऊन भगवानराव पाटील मनूरकर यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या घंटानाद आंदोलनाला खा. रवींद्र पाटील चव्हाण यांनी भेट दिली. यावेळी जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष नगरसेवक अब्दुल गफ्फार, नगरसेवक मुन्ना अब्बास हुसेन, महेश देशमुख आदी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# सिरसाट पाटील परिवाराने केले तिन्ही सुनांचे गौरीपूजन

## सासू-सुनेच्या प्रेमळ नात्याचा अनोखा आदर्श; 'खरी लक्ष्मी सूनच' असल्याचा दिला संदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –सासू-सुनेमध्ये मतभेद होतात, त्यांच्यात नेहमी खटके उडतात, असे चित्र अनेकदा पाहायला मिळते. मात्र, या रूढ समजुतीला छेद देत सासू-सुनेमधील प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीचे अनोखे उदाहरण लोहा तालुक्यातील उमरा येथे पाहायला मिळाले. उमरा येथील मोहनराव पाटील सिरसाट यांच्या परिवाराने गौरीपूजनाच्या निमित्ताने आपल्या सुनांना ज्येष्ठा गौरी आणि कनिष्ठा गौरीचा मान देत पारंपरिक पद्धतीने त्यांचे पूजन केले. दोन्ही सुनांना मखरामध्ये गौरीच्या रूपात बसवून विधिवत पूजा करण्यात आली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून सिरसाट पाटील परिवाराने सासू-सुनेच्या नात्यातील



प्रेम आणि परस्पर सन्मानाचा सुंदर संदेश समाजासमोर ठेवला. यंदाच्या गौरी उत्सवात 'चालत्या-बोलत्या गौरी'चे पूजन करून 'खरी लक्ष्मी ही सूनच असते', असा भावनिक आणि कौटुंबिक संदेश परिवाराने दिला. या उपक्रमाची परिसरात विशेष चर्चा होत असून, सासू-सुनेच्या नात्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा हा उपक्रम ठरत आहे.

### सुना घेतात कुटुंबाची काळजी

यावेळी परिवारातील ज्येष्ठांनी आपल्या सुनांबद्दलच्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आमच्या सुना वर्षभर आमची आणि संपूर्ण कुटुंबाची मनापासून काळजी घेतात. सुनेला प्रेम आणि आपुलकी दिली, तर तीही मुलगी बनून घराला जोडून ठेवते. गौरीपूजनाच्या माध्यमातून सासू-सुनेमधील प्रेम, सलोखा आणि जिव्हाळा अधिक दृढ व्हावा, हाच यामागचा आमचा उद्देश आहे, असे मत सौ. वत्सलाबाई मोहनराव सिरसाट (सासू), सौ. संगीता भगवानराव सिरसाट (सासू), मोहनराव गोविंदराव सिरसाट (सासरे) यांनी सांगितले.

# शिवाजीनगर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; २.१३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत शिवाजीनगर पोलिसांनी सावित्रीबाई फुलेनगर भागातील मोकळ्या जागेत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून रोख रक्कम, मोबाईल फोन व तीन दुचाकी असा एकूण २ लाख १३ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, सावित्रीबाई फुलेनगर येथे राहुल चिखलीकर यांच्या घराशेजारील मोकळ्या जागेत काही इसम पैशांवर 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत व खेळवत आहेत. या माहितीच्या आधारे दोन पंचांना सोबत घेऊन पोलिसांनी घटनास्थळी अचानक छापा टाकला. यावेळी ५ इसम पत्ते व पैशांवर जुगार खेळताना मिळून आले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे – शेख अन्वर शेख उमर (वय ४०, रा. मस्तानपुरा), सय्यद अजर सय्यद बब्बू (वय ३६, रा. नोबल कॉलनी), अमोल मधुकर वन्ने (वय ३६, रा. जयभीमनगर), राहुल वामन चिखलीकर (वय ४२, रा. जयभीमनगर) आणि पठाण फैरोज पठाण सुलतान मियाँ (वय ४०, रा. गोकुळनगर, सर्व रा. नांदेड) अशी आहेत. पंचांसमक्ष केलेल्या कारवाईत आरोपींकडून रोख रक्कम ३,०३० रुपये, विविध कंपनीचे ५ स्मार्टफोन (अंदाजे किंमत ८९,००० रुपये), ३) तीन मोटारसायकली (MH-२६-DD-०४७६, MH-२६-L-८०४९, MH-२६-BM²-४६७९) अंदाजे किंमत १ लाख २० हजार रुपये आणि जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख १३ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# सप्टेंबरमध्येच 'ऑक्टोबर हिट'! किनवटमध्ये उन्हाच्या तीव्रतेत वाढ

## जलसाठ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा, खरीप पिके धोक्यात

**किनवट (प्रतिनिधी)**– सप्टेंबर महिन्याचा उत्तरार्ध सुरू असतानाच परिसरात उन्हाची तीव्रता पुन्हा वाढली असून, सप्टेंबरमध्येच नागरिकांना 'ऑक्टोबर हिट'चा अनुभव येत आहे. दिवसभर कडक ऊन आणि वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एकीकडे पावसाळ्याचे दिवस सुरू असताना दुसरीकडे पावसाने दडी मारल्याने शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे.



यंदाच्या खरीप हंगामात पिकांची पेरणी झाल्यानंतर सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. मात्र, सध्या पावसाने मोठी उघडीप दिल्याने अनेक भागांतील पिकांना पाण्याची आवश्यकता भासत आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध खरीप पिकांवर पावसाच्या अनिश्चिततेचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

परिसरातील नदी, नाले, तलाव आणि इतर जलसाठ्यांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झालेला नसल्याने आगामी काळातील पाणीटंचाईचीही चिंता व्यक्त होत आहे. मोठा आणि दमदार पाऊस झाल्यास जलसाठ्यांना दिलासा मिळू शकतो. मात्र, पावसाने आणखी दडी मारल्यास खरीप पिकांसह आगामी रब्बी हंगामावरही त्याचा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. एकूणच निसर्गाच्या लहरीपणामुळे तालुक्यात कोरडा दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली आहे.

### रब्बी हंगामाचीही चिंता

खरीप हंगामानंतर रब्बी पिकांसाठी जमिनीत पुरेसा ओलावा आणि जलसाठ्यांमध्ये आवश्यक पाणीसाठा असणे गरजेचे आहे. यंदा पावसाची अनिश्चितता कायम राहिल्यास रब्बीची पेरणी तसेच सिंचनाचे गणित बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लक्ष आता परतीच्या पावसाकडे लागले आहे.

### जलसाठे अपुरे; गणेशभक्तांमध्ये चिंता

गणेशोत्सवाचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत असला, तरी गणेशमूर्ती विसर्जनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होणार का, असा प्रश्न गणेशभक्तांसमोर उभा राहिला आहे. अनेक ठिकाणी जलसाठे कमी असल्याने पारंपरिक विसर्जनस्थळांवर पाण्याची कमतरता जाणवण्याची शक्यता आहे.श्री विसर्जनापूर्वी तालुक्यात पावसाची पावसाने दमदार हजेरी लागून जलसाठे तुडुंब भरावेत, खरीप पिकांना जीवदान मिळावे आणि रब्बी हंगामासाठीही पुरेसा पाणीसाठा उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांतून व्यक्त होत आहे.



**नांदेड** –शिक्षणाधिकारी तानाजी भोसले व विठ्ठल भुसारे यांनी मराठवाड्यातील दुष्काळ व समृद्धी महामार्ग शेतकरी आंदोलनप्रश्नी सुप्रसिध्द सिने-नाट्य अभिनेते तथा नाम फाऊंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर यांची भेट घेतली. या भेटीत नांदेडचा उल्लेख निघताच नाम फाऊंडेशनचा नांदेड येथील कार्यक्रम, दैनिक गोदातीर समाचार व केशव घोणसे पाटील यांची आवर्जून आठवण निघाली. (छाया : शिवाजीराजे पाटील)

# देगलूरमध्ये जुगार अड्ड्यांवर पोलिसांचे छापे; १६ जणांवर गुन्हे दाखल, १ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत देगलूर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून 'तिर्रट' नावाचा जुगार खेळणाऱ्या १६ जणांवर कारवाई केली आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ३० हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे देगलूर पोलीस पथकाने पंचांसमक्ष हनुमान मंदिरासमोरील मोकळ्या जागेत, देगाव पुनर्वसन येथे छापा मारला.

यावेळी तानाजी बालाजी थडके (वय ३०, रा. देगाव), हणमंत निवृत्ती डोंगळे (वय ३१, रा. देगाव), राजेश शिवाजी जाधव (वय २८, रा. देगाव) आणि चंद्रकांत सुरेश शिंदे (वय ३३, रा. देगाव पुनर्वसन) हे चौघे गोलाकार बसून तिर्रट नावाचा जुगार खेळताना व खेळवताना मिळून आले.

घटनास्थळावरून पोलिसांनी पंचांसमक्ष ११ हजार ८४० रुपये रोख, २ मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य असा एकूण २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस ठाणे देगलूर येथे गु.र.नं. ४६२/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिफ २० सप्टेंबर २०२६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीवरून अंगणवाडीसमोरील मोकळ्या जागेत, गवंडगाव येथे काही इसम जुगार खेळत असल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून १२ जणांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्यांची नावे तुकाराम मारोती मरपळे (वय २४), अविनाश यादव गजरे (वय २८), सुरेश विठ्ठलराव नरमुळे (वय ५०), मारोती रावबा सोनतोडे (वय ४७), गणेश माधवराव वरखिंडे (वय ४०), ज्ञानेश्वर पंढरीनाथ साधू (वय ५४), दत्ता माधवराव वरखिंडे (वय ४०), दिलीप गोविंद गोरे (वय २४), शहाजी यादव लुटे (वय ३५), प्रतीक बालाजी नरवाडे (वय २३), ज्ञानेश्वर गणपत नरमुळे (वय २०) आणि रमेश चंदर गुडलवार (वय ३२) यांच्याकडून ७ हजार ७६० रुपये रोख, ९ मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ८ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करून १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com